सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. ०२ जुलै २०२५ वर्ष - तिसरे अंक ९० पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# उत्तराखंडमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस, महाराष्ट्राचे २०० पर्यटक अडकले; मुंबईतील ५० जणांचा समावेश

## मराठी बांधवांच्या मदतीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरसावले

मुंबई: उत्तराखंडमध्ये अडकलेल्या मराठी पर्यटकांच्या मदतीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपला हात पुढे केला आहे. उत्तराखंडमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे भुस्खलनात रस्ते बंद झाल्याने अनेक पर्यटक तिथे अडकून पडले आहेत. ज्यामध्ये महाराष्ट्रातील एकूण २०० पर्यटक अडकले असल्याची बातमी आहे. ज्यामध्ये तब्बल १५० पर्यटक हे मराठी आहेत. या मराठी पर्यटकांपर्यंत मदत पोहचवण्याची विनंती एकनाथ शिंदे यांनी उत्तराखंडच्या मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

यमुनोत्री इथे सतत मुसळधार पाऊस सुरू आहे. ज्यात विविध राज्यातील अनेक यात्रेकरून अडकले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील २०० पर्यटकांचा समावेश आहे, ज्यातील ५० मुंबईतील असल्याची माहिती आहे. हवामान खात्याद्वारे उत्तराखंड मध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला असून, अतिवृष्टीमुळे हजारो पर्यटक ठिक-ठिकाणी अडकून पडले आहेत. यमुनोत्री धाम रस्ता बंद करण्यात आला असून, रेस्क्यू ऑपरेशन सुरू आहे. द इकॉनॉमिक टाईम्सच्या वृत्तानुसार, अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे हलवण्यात आले आहे



आणि कोणतीही जीवितहानी झालेली नाही .

**चारधाम यात्रा विस्कळीत**

ढगफुटीमुळे तेहरी जिल्ह्यासारख्या इतर भागातही भूस्खलन झाले असून, त्यामुळे चार धाम यात्रा विस्कळीत झाली. बारकोट-यमुनोत्री रस्त्याला देखील याचा फटका बसला आहे, या रस्त्याचा काही भाग वाहून गेला. बद्रीनाथ महामार्ग आणि यमुनोत्री मार्गावर पुराच्या ढिगाऱ्यामुळे आणि रस्त्याच्या नुकसानीमुळे परिणाम झाला आहे, तर सिलई बंदजवळील प्रभावित रस्त्याच्या भागाची दुरुस्ती करण्यात आली आहे. रस्त्याचे इतर नुकसान झालेले भाग आणि वीज वाहिन्या दुरुस्त करण्याचे काम अधिकारी करत आहेत. या घटनेमुळे अधिकाऱ्यांनी यात्रेकरूंना परिस्थिती सुधारेपर्यंत तिथेच थांबण्याचा आणि प्रवास टाळण्याचा सल्ला जारी केला आहे.

हिमाचल, उत्तराखंड या राज्यांमधील अनेक भागांमध्ये गाड्या वाहून गेल्या आहेत तर काही काही घरांमध्ये पाणी भरलं असून, काही ठिकाणी पत्त्याच्या बंगल्यासारखी घरं जमीनदोस्त झाल्याचे पाहायला मिळते आहे. अनेक अहवालांवरून असे दिसून आले आहे की, अडकलेल्या यात्रेकरूंना मदत करण्यासाठी आणि कचरा साफ करण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे आणि मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे बाधित झालेल्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

## अरबी समुद्रात तेलवाहक जहाजाला आग, भारतीय नौदलाने १४ जणांना वाचवले



मुंबई : अरबी समुद्रात 'एमटी यी चेंग' नावाच्या तेलवाहक जहाजाला आग लागली. भारतीय नौदलाने आग लागल्याची माहिती मिळताच तातडीने मदतकार्य सुरू केले. 'एमटी यी चेंग'वर असलेल्या १४ क्रू ना वाचवण्यात आले. यात आठ खलाशी आणि सहा अधिकारी आहेत. जहाजावरील सर्व जण सुरक्षित आहेत. वैद्यकीय पथकाने त्यांची तपासणी करुन सर्व क्रू सदस्य सुखरुप असल्याचे सांगितले. आयएनएस तबर घटनास्थळाजवळ उपस्थित आहे.

भारतीय नौदलाने तातडीने कारवाई केली आणि जहाजाला लागलेली आग विझवली. यामुळे समुद्रात संकटात सापडलेले जहाज वाचले. प्रशांत (पॅसिफिक) महासागरातील पलाउ हा छोटा देश आहे. पलाउ फिलिपाईन्सच्या पूर्वेला ८०० किमी व जपानच्या दक्षिणेला ३२०० किमी अंतरावर आहे. या देशाचा ध्वज असलेली 'एमटी यी चेंग' नावाची तेलवाहक नौका अरबी समुद्रातून प्रवास करत होती. या प्रवासादरम्यान तेलवाहक जहाजाला आग लागली. आग लागल्यामुळे जहाजावरील विजेचा पुरवठा ठप्प झाला. भारतीय नौदलाने तातडीने मतकार्य सुरू केले. या मदतीमुळे जहाज आणि जहाजावरील क्रू सुरक्षित आहे. आग विझविण्यात आली आहे. आयएनएस तबरवरील नौसैनिक आणि 'एमटी यी चेंग' जहाजावरील अधिकारी - कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन जहाजाच्या इंजिन रूमला लागलेली आग विझवली.

**जहाजावरील सर्व कर्मचारी भारतीय वंशाचे**

'एमटी यी चेंग' या तेलवाहक जहाजावरील सर्व १४ अधिकारी - कर्मचारी हे भारतीय वंशाचे आहेत. भारतीय नौदलाने या सर्वांना वाचवले आहे.

## आषाढी एकादशीला प्रवासी सेवेसाठी येणाऱ्या सर्व एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था

मुंबई: आषाढी एकादशी निमित्त श्री. क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५२०० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. ह्या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी तसेच या सर्वांना मार्गदर्शन करणारे पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात त्यांच्या जेवणाची आबाळ होऊ नये, म्हणून यंदा स्वखर्चाने मी सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील विठुराया ची सेवा करण्याची संधी मला मिळत आहे. अर्थात, हे पुण्य पैशात मोजण्यासारखे नाही. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम मी राबवणार आहे. असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी यावेळी केले.

## तेलंगणातील रसायनाच्या कारखान्यात स्फोट, ३४ ठार

पटानचेरू : तेलंगणातील पटानचेरू येथे सिगाची केमिकल्स नावाच्या रसायनाच्या कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटामुळे ३४ जणांचा मृत्यू झाला. ढिगाऱ्यातून आतापर्यंत ३१ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. जखमींपैकी तीन जणांनी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. यामुळे सिगाची केमिकल्समधील स्फोटामुळे ठार झालेल्यांची संख्या ३४ झाली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक परितोष पंकज यांनी ढिगाऱ्यातून ३१ मृतदेह काढण्यात आल्याचे आणि रुग्णालयात तीन जणांचा



मृत्यू झाल्याचे सांगितले. घटनास्थळी मदतकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. सिगाची केमिकल्समधील दुर्घटनेची चौकशी होणार आहे.

कारखान्यात नेहमीप्रमाणे कामकाज सुरू असताना स्फोट झाला. रिॲक्टर फुटला. स्फोटाचे नेमके कारण अद्याप समजलेले नाही. स्फोटामुळे कारखान्यात आग लागली. ही आग वेगाने पसरली. अनेकांना स्वतःला सावरण्याची, वाचवण्याची संधी मिळाली नाही.

स्फोट झाला त्यावेळी कारखान्यात १५० जण होते. ज्या ठिकाणी स्फोट झाला त्या भागात ९० जण कार्यरत होते. स्फोटाचा आवाज येताच अनेकांनी वेगाने कारखान्याबाहेर धाव घेतली. पण झपाट्याने पसरलेल्या आगीमुळे ३४ जणांना जीव गमवावा लागला.

## शिवकाशीत फटाका कारखान्यात स्फोट, चौघांचा मृत्यू

शिवकाशी : तामिळनाडूतील शिवकाशीत फटाका कारखान्यात स्फोट झाला. या स्फोटामुळे चार मजुरांचा मृत्यू झाला आणि पाच जण जखमी झाले.

विरुधुनगर जिल्ह्यातील शिवकाशीजवळील चिन्ना कामनपट्टी गावात एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. स्फोटामुळे चार मजुरांचा मृत्यू झाला आणि पाच जण जखमी झाले. जखमींवर विरुधुनगर सरकारी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी पोलीस आणि अग्निशमन दलाचे पथक उपस्थित आहे. दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू आहे.

# म्हाडा छत्रपती संभाजीनगर, नाशिक मंडळातर्फे १४१८ निवासी सदनिका व भूखंडांसाठी सोडत

## सदनिका विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणीसह अर्ज भरणा प्रक्रिया सुरू

मुंबई : म्हाडाचा विभागीय घटक छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाच्या अखत्यारीतील छत्रपती संभाजीनगर शहर-जिल्हा, बीड व नाशिक शहरामधील विविध गृहनिर्माण योजनेअंतर्गत १ हजार ४१८ निवासी सदनिका व भूखंडांच्या ऑनलाइन संगणकीय सोडतीद्वारे विक्रीकरिता https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी आणि अर्ज भरणा प्रक्रियेचा 'गो लाईव्ह' शुभारंभ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे (म्हाडा) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आला. म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला मुख्य अभियंता धीरजकुमार पंदिरकर, छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाचे मुख्य अधिकारी शिवकुमार



आवळकंठे आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे जाहीर सोडत तीन घटकांमध्ये विभागण्यात आली आहे. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत १ हजार १४८ सदनिका, म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत १६४ सदनिका, २० टक्के सर्वसमावेशक योजनेअंतर्गत ३९ सदनिका/ भूखंडांचा समावेश आहे. तसेच नाशिक मंडळातील २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ६३ सदनिका व म्हाडा गृहनिर्माण योजनेतील ४ सदनिकांचा सोडतीत समावेश आहे. या सोडतीत अत्यल्प उत्पन्न गटाकरिता ११४८ सदनिका, अल्प उत्पन्न गटाकरिता २६६ सदनिका, मध्यम उत्पन्न गटाकरिता ४ सदनिकांचा समावेश आहे. छत्रपती संभाजी नगर व नाशिक मंडळाच्या संगणकीय सोडतीसाठी एकात्मिक गृहनिर्माण सोडत व्यवस्थापन प्रणाली म्हणजेच Integrated Housing Lottery Management System (IHLMS 2.0) या नूतन संगणकीय प्रणाली व ॲपवर सदनिकांच्या अर्ज नोंदणी प्रक्रियेस आज दुपारी १२.०० वाजेपासून प्रारंभ झाला आहे.

छत्रपती संभाजीनगर व नाशिक मंडळाने जाहीर केलेल्या सदनिका विक्री सोडतीत सहभाग घेण्याकरिता दि. ११ ऑगस्ट, २०२५ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज सादर करता येणार आहे. दि. ११ ऑगस्ट रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत अर्जदार अनामत रकमेचा भरणा ऑनलाईन करू शकतील. दि. १२ ऑगस्ट, २०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS/ NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. अशाप्रकारे सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे अर्जदारच या प्रणालीद्वारे पात्र ठरविले जातील.

सोडतीसाठी पात्र अर्जांची प्रारूप यादी दिनांक दि. १८ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता 'म्हाडा'च्या https://housing.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता अंतिम पात्र अर्जांची यादी जाहीर केली जाणार आहे. सोडतीचे स्थळ व दिनांक मंडळातर्फे नंतर कळविण्यात येणार आहे.

## महाराष्ट्रात स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर

मुंबई : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडने दिलेल्या माहितीनुसार राज्यात स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत. विधानसभेत वीज मीटर संदर्भात एक तारांकीत प्रश्न आला होता. या प्रश्नाला उत्तर देताना राज्यात विजेचे स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत. या मीटरच्या मदतीने बिलिंग केले जाते; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. आतापर्यंत



२८ हजार २०२ वाहिन्यांवर स्मार्ट माटर बसविले आहेत. राज्यात आतापर्यंत ४ लाख ७ हजार ५०७ पैकी १ लाख ४० हजार ५६१ रोहित्रांना (ट्रान्सफॉर्मर) स्मार्ट मीटर बसविले आहेत. राज्यातील २ कोटी २४ लाख ८८ हजार ग्राहकांपैकी ३२ लाख २३ हजार ग्राहकांनी स्मार्ट मीटर बसवून घेतली आहेत. ही सर्व स्मार्ट प्रीपेड नाही स्मार्ट पोस्टपेड मीटर आहेत; अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

स्मार्ट पोस्टपेड मीटर रिअल-टाइम डेटा पुरवतात. यामुळे नेमकी किती वीज वापरली याची अचूक आकडेवारी कंपनीला आणि ग्राहकाला मिळते. या आकडेवारीआधारे योग्य ते बिल ग्राहकाला आकारले जाते. चेक, थेट खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर अथवा युनिफाईड पेमेंट सर्व्हिस अर्थात यूपीआयच्या मदतीने ग्राहक बिलाचा भरणा कंपनीला करू शकतात.


## पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत मोठा गदारोळ

### नाना पटोलेंचे दिवसभरासाठी निलंबन, राहुल नार्वेकर भडकले अन् थेट

मुंबई : राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत मोठा गदारोळ झाल्याचं पाहायला मिळतंय. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी भाजप आमदार बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविरोधात केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून सभागृहात संताप व्यक्त केला. त्यानंतर नाना पटोले हे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या जागेजवळ गेले आणि त्यांनी राज दंडाला हात लावला. यानंतर नाना पटोले यांना एक दिवसासाठी निलंबित करण्यात आले.

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही कारवाई केली. काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांना एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विधानाचा मुद्दा नाना पटोलेंनी विधानसभेत उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील शेतकऱ्यांची माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली. यावेळी विधानसभेत प्रचंड गदारोळ झाला. त्यानंतर विधानसभा अध्यक्षांनी नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई केली.

नाना पटोले म्हणाले की, या सरकारमधले सदस्य बबनराव लोणीकर आणि राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे ज्या पद्धतीने सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान करत आहेत. हा अपमान आता राज्यातील शेतकरी सहन करणार नाही. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या राज्याच्या शेतकऱ्यांची जाहीर माफी मागितली पाहिजे. ज्या पद्धतीने सातत्याने मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही. असे वक्तव्य अजिबात चालणार नाही. त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे म्हणत नाना पटोले यांनी जोरदार संताप व्यक्त केला. यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले की, नाना पटोले तुमच्याकडून असंसदीय भाषेचा उपयोग होणे, मला बरोबर वाटत नाही, हे चुकीचे आहे, असे त्यांनी म्हटले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## चिमुरडीला फाशी देणारा बाप अटकेत; नराधमाला फाशी द्यावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
चॉकलेटसाठी पैसे मागितल्याने चार वर्षीय चिमुकलीला साडीने गळफास देऊन क्रूरपणे तिचा खून करणाऱ्या निर्दयी बापास उदगीर पोलिसांनी अटक केली असून, या नराधम बापास फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. आरुषी बालाजी राठोड असे त्या दुर्दैवी मुलीचे नाव आहे.

आरुषीची आई वर्षा बालाजी राठोड यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, फिर्यादी वर्षा यांचे आरोपी बालाजी बाबू राठोड याच्यासोबत विवाह झाला होता. त्यांना एक मुलगा आर्यन (वय ६) आणि मुलगी आरुषी (वय ४) अशी दोन अपत्य झाली. आरोपीला दारूचे व्यसन जडल्याने तो सतत पत्नी वर्षा यांना मारहाण करून वारंवार पत्नी व दोन्ही लेकरांना जीवे मारण्याची धमकी देत होता. पतीच्या भीतीपोटी तीन महिन्यांपूर्वी पत्नी वर्षा या मुलीला घेऊन माहेरी लिंबोटी येथे राहायला गेल्या होत्या. आरोपी बालाजी राठोड हा लिंबोटी येथे गेला होता. तेथे जाऊन पत्नीच्या ताब्यातून चार वर्षांची मुलगी आरुषी हिला जबरदस्तीने भीमा तांडा येथे आणले होते.

तिला ठार मारतो, अशी धमकीही त्याने पत्नी वर्षा यांना दिली होती. दरम्यान, रविवारी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास आरोपी बालाजी राठोड याने त्याची चार वर्षांची मुलगी आरुषी हिने चॉकलेट खाण्यासाठी पैसे मागितले. त्यामुळे घरात साडीने आरुषीला फाशी देऊन तिचा खून केला. या घटनेनंतर आरोपीला नातेवाईकांनी बेदम चोप दिला, त्याला घरातच बांधून ठेवून पोलिसांना बोलावून घेतले.

पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर देवकत्ते, पोलीस कर्मचारी संतोष उर्फ नाना शिंदे, नामदेव चेवले, सचिन नाडागुडे हे तत्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी आरोपीला अटक केली.



### संक्षिप्त वृत्त...

## राजर्षी शाहू जयंतीनिमित्त शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त लातूर शहरातील मेघराज नगरात शिवसेना शिंदे गटाच्या मागासवर्गीय विभागाने हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले.

संजय सोनकांबळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कार्यक्रमात सचिन दाने, विष्णू साबदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर शाहू महाराजांना वंदन करून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## रस्त्यावर थांबण्याच्या कारणावरून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
शहरातील होळकर नगर येथे रस्त्यावर थांबण्याच्या कारणावरून शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून फिर्यादीच्या कमरेवर लोखंडी कोयता काढून मारून जखमी केल्याची घटना २८ जून रोजी घडली. याबाबत विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी सांगितले, फिर्यादी ऋषिकेश शंकर माचवे (रा. होळकर नगर, गणेश मंदिर, लातूर) यांना रस्त्यावर थांबण्याच्या कारणावरून आरोपीने लाथाबुक्क्यांनी मारहाण करून कमरेवर लोखंडी कोयता काढून मारून जखमी केले. डोक्यात मारूनही जखमी केले. तुला खलास करतो म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली, असे ऋषिकेश माचवे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. त्यानुसार राहुल टिंगोटे (रा. संजय नगर, लातूर) याच्याविरुद्ध विवेकानंद चौक पोलिसात गुन्हा नोंद आहे. तपास सहायक फौजदार वांगे करीत आहेत.

## शिक्षकांसाठी उद्‌बोधन कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट अंतर्गत श्रीमती सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयात शिक्षकांसाठी एकदिवस उद्बोधन कार्यशाळा घेण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय पाटील होते.

उद्घाटन मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष चंद्रकांत साळुंके यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्याध्यापक संघाचे माजी अध्यक्ष वसंतराव पाटील, बबन गायकवाड, आर.एल. कसबे, डॉ. प्रशांत मुगळे, शिवलिंग नागापुरे, बी.टी. बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक मुख्याध्यापक बी.एन. पवार यांनी केले. सूत्रसंचालन संतोष जाधव, सचिन रणदिवे तर आभार मधुकर धुमाळ यांनी मानले.

## सोलर एनर्जी अवेअरनेस प्रोग्राममध्ये दयानंद महाविद्यालय प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडिया व विवा कॉलेज, विरार यांच्या सहकार्याने ५५५५५ तरुणांना सोलर एनर्जी अवेअरनेस प्रोग्राम २०२५ हे प्रशिक्षण राज्यभरातील विद्यार्थ्यांना देण्यात आले.
यावेळेस प्रोग्राम नंतर एक परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातून अनेक विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. यामधून महाविद्यालयातून महेश सुवर्णकार, हर्षवर्धन जाधव व सानिका लोकरे या विद्यार्थ्यांनी सोलर एनर्जी अवेअरनेस प्रोग्राम मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आयक्यू एसी समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा अष्टेकर, बीसीए विभाग प्रमुख प्रा. शशिकांत स्वामी, करिअर कट्टाचे लातूर जिल्हा समन्वयक डॉ. साईनाथ उमाटे, करिअर कट्टा महाविद्यालीन समन्वयक प्रा. अजय चव्हाण, प्रा. क्षितिज कांबळे, प्रा. ज्योती महावरकर, प्रा. सिद्दिका पटेल, प्रा. दगडू शेख,प्रा. अक्षय पवार, प्रा. शैलजा चिकटे आदी उपस्थित होते.

## सर्वांच्या समन्वयातून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवू : तांबे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
यापूर्वी मी मराठवाड्यात सेवा दिली नाही. सर्वांच्या सूचना घेऊन, जिल्ह्यातील समस्या जाणून घेऊन सर्वांच्या समन्वयातून जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी योग्य ती कार्यवाही करू , अशी माहिती नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सोमवारी (दि.३०) प्रसिध्दी माध्यमाशी बोलताना दिली.

लातूरचे नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सोमवारी आपला पदभार स्वीकारला. नव्या पोलीस अधीक्षकांचे पोलीस प्रशासनाकडून स्वागत करण्यात आले. मावळते पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी जिल्ह्याचे नूतन पोलीस अधीक्षक तांबे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर पोलीस अधीक्षक तांबे यांनी माध्यमाशी संवाद साधला. पोलीस विभागाशी निगडीत समस्या जाणून घेऊन त्यावर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

### गुन्हेगारीला आळा घालणार का?

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी यापूर्वी नाशिक येथे पोलीस आयुक्त म्हणून काम केले आहे. त्यानंतर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे येथे पोलीस अधीक्षक पदाचा पदभार त्यांच्याकडे होता. आता लातूर पोलीस अधीक्षकपदी त्यांची निवड झाली आहे. तांबे यांची कडक शिस्तीचे पोलीस अधीक्षक म्हणून ख्याती आहे. नाशिक येथे उपायुक्त असताना त्यांचे काम कौतुकास्पद होते, असे सांगितले जाते. आता तांबे हे लातुरातील बेशिस्त वाहतूक, वाढती गुंडगिरी, चोरी आणि हाणामारीच्या घटनांना आळा घालतील का, याकडे लातूरकरांचे लक्ष लागले आहे.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांची पुणे येथे बदली झाली आहे. लातूर जिल्ह्यात अडीच वर्षे समाधानकारक काम करता आले. लातूरकरांच्या सहकार्यामुळे अनेक चांगले उपक्रम जिल्ह्यात राबविता आले. कायदा सुव्यवस्था, गुन्हेगारी कारवाया यावर वचक ठेवता आला जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, नागरिक, जिल्हा पोलीस दलातील अधिकारी आणि अंमलदारांनी या कार्यकाळात सहकार्य केल्याबद्दल त्यांनी निरोप समारंभात समाधान व्यक्त केले. लातूर जिल्ह्यात खूप चांगला अनुभव मिळाला, खूप काही शिकता आले, याचा सोमय मुंडे यांनी आवर्जून उल्लेख केला.

यावेळी अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, पोलीस उपाधीक्षक गजानन भातलवंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणे प्रभारी, पोलीस अधिकारी आणि पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



## अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा निर्णय घ्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
पावसाळी अधिवेशनात शेतकरी कर्जमाफी, शेतकरी सन्मान निधीत वाढ याबाबतचा अंतिम निर्णय घेऊन राज्य सरकारने कार्यवाही करावी आणि संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा द्यावा, अशी मागणी 'लातूर ग्रामीण'चे माजी आमदार धीरज देशमुख यांनी केली आहे.

पावसाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरूवात झाली आहे. यानिमित्त लातूर ग्रामीण मतदारसंघाचे माजी आमदार धीरज देशमुख यांनी शेतकरी कर्जमाफीची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देणार, असे आश्वासन महायुतीने निवडणुकीपूर्वी दिले होते. शेतकरी सन्मान निधी योजनेतून मिळणाऱ्या निधीत ३ हजार रुपयांची वाढ करण्याचे वचनही दिले होते. याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याची सध्या गरज असताना राज्य सरकारकडून या विषयांकडे दुर्लक्ष केले जात आहे, टाळाटाळ केली जात आहे. मागील महिन्यात अवकाळी पावसाचे संकट शेतकऱ्यांसमोर होते. आता पेरण्या झाल्यानंतर पाऊसच नाही. त्यामुळे पिके जगवायची कशी, हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. काही ठिकाणी तर, दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांसमोर आहे. पण, पेरणीसाठी जवळ पैसा नाही. संकटाची ही मालिका संपत नसल्याने शेतकरी दरवर्षी आर्थिक संकटात सापडत आहे. त्यात शेतीमालाला योग्य भाव नाही. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याची ही व्यथा समजून घेऊन सरकारने सरसकट कर्जमाफी लागू करावी आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

## देवणी जिल्हा परिषद शाळेची इमारत धोकादायक; शौचालयाचीही दुरवस्था

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
येथील जिल्हा परिषद शाळेतील गैरप्रकारासंदर्भात ठाकरे सेनेच्या महिला आघाडीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या शाळेची इमारत धोकादायक बनली असून, शौचालयाचीही दुरवस्था झाली आहे. या शाळेमध्ये अनेक शिक्षक गैरहजर असतात तर चक्क कनिष्ठ लिपिक इतिहास विषय शिकवत असल्याचे आढळून आले आहे. यासंदर्भात तत्काळ कार्यवाहीची मागणी करण्यात आली आहे.

ठाकरे सेनेच्या महिला आघाडीच्या जिल्हा संघटक जयश्री उटगे यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले. या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देवणी येथील जिल्हा परिषद शाळेला भेट दिली असता, अतिशय विदारक परिस्थिती समोर आली. इयत्ता नववीच्या वर्गावर विषय शिक्षकाच्या ऐवजी कनिष्ठ लिपिक इतिहास विषय शिकवताना दिसून आले. या शाळेतील मुलींच्या शौचालयाची दुरवस्था झाली असून, मुलींच्या उर्दू माध्यमाच्या शाळेस संरक्षक भिंत नाही, शौचालय नाही, शाळेची इमारत ही धोकादायक परिस्थितीत आहे. शाळेतील शिक्षकांचे रजेचे अर्ज किंवा मस्टरवर सह्या नसतानाही शिक्षक गैरहजर असल्याचे आढळून आले. यासंदर्भात मुख्याध्यापकांना विचारणा केली असता, 'मी प्रभारी आहे' असे म्हणत त्यांनी जबाबदारी झटकून टाकली. या प्रकरणी संबंधितांवर कार्यवाही करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी जयश्री उटगे यांच्यासह देवणी शहर प्रमुख दीपक स्वामी-मळभागे, विशाल बाबरे, सरोजा गायकवाड, रेखा पुजारी आदी उपस्थित होते.



## जय जगदंबा देवस्थानने घेतले शाळेचे पालकत्व

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
शहरातील गंजगोलाई येथील श्री जय जगदंबा देवस्थानने धार्मिक पावित्र्य कायम राखत सामाजिक जाणिवेचे एक उत्कृष्ट उदाहरण सादर केले आहे. देवस्थानने गरूड चौकातील महापालिका शाळा क्रमांक २, संत मदर तेरेसा विद्यालयाचे पालकत्व स्वीकारले असून, या शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व शैक्षणिक आणि भौतिक सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर देवस्थान नेहमीच विविध समाजोपयोगी उपक्रम राबवण्यात अग्रेसर राहिले आहे. यामध्ये दरवर्षी महापालिकेच्या विविध शाळांमधील शेकडो विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, गतवर्षी गरीब, गरजू आणि निराधार महिलांना ४५ शिलाई मशीनचे वितरण, तसेच दरवर्षी महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करून हजारो व्यक्तींची मोफत वैद्यकीय तपासणी करून पुढील उपचारासाठी मदत करणे यासारख्या उपक्रमांचा समावेश आहे.



यावेळी देवस्थानचे उपाध्यक्ष शिवशंकर पारशेट्टी, सचिव बसवंतप्पा भरडे, विश्वस्त वीरभद्र वाले, ॲड. गंगाधरप्पा हामणे, शांतेश्वर बरबडे, प्रकाश पाटील, हरिश कटारिया यांच्यासह शाळेचे शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. देवस्थानच्या या उपक्रमामुळे समाजासमोर एक आदर्श निर्माण झाला आहे आणि अनेक गरजवंत विद्यार्थ्यांना यातून मोठा आधार मिळणार आहे.

देवस्थानच्या या सामाजिक उपक्रमाचे शैक्षणिक वर्तुळातून कौतुक होत आहे. विश्वस्तांनी शाळेला भेट दिली. यावेळी मुख्याध्यापक भिंगोले यांनी निवेदन देऊन शाळेसाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची माहिती दिली. या शाळेत शिकणारी सर्व मुले गोरगरीब आणि कष्टकरी पालकांची असल्याने, या विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदतीबाबत विश्वस्त मंडळाकडून आश्वासन देण्यात आले.

## फाउंडेशनने केला लातुरात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
'पटवेकर, अत्तार, तांबोळी, मणियार फाउंडेशन'ने लातूरमध्ये मुस्लीम समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला. दहावीत ९०% हून अधिक गुण मिळविलेल्या आणि नीटमध्ये यशस्वी झालेल्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांना सन्मानित केले.

कार्यक्रमात मौलाना शौकत यांच्या कुराण पठणानंतर चार्टर्ड अकाउंटंट मोहसीन शेख आणि सेवानिवृत्त सैन्य अधिकारी सी.ए. तांबोळी यांनी मार्गदर्शन केले. तांबोळींनी शैक्षणिक यशासोबतच शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे महत्त्व व खेळांचे फायदे सांगितले. हाजी अ. रहेमान मणियार, तबरेज तांबोळी, अहेमद मेहबूब पटवेकर, मो. कामील मणियार, सादीक अत्तार, एम. मैनोद्दीन मणियार या मान्यवरांचा सत्कार झाला. शादाब पटवेकर यांनी प्रास्ताविक केले, गालिब शेख आणि रशीद कासार यांनी सूत्रसंचालन केले, तर सरफराज मणियार यांनी आभार मानले. अनेक सदस्यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

## संस्थाचालकांनी कर्तव्यभावना, सेवाभाव जोपासावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
श्री देशिकेंद्र विद्यालयाची उभारणी श्री देशिकेंद्र महाराजांच्या त्याग आणि समर्पनातून झाली आहे. हे लक्षात घेत सेवाभावी संस्थाचालक आणि ध्येयवादी कर्मचारी यांच्यामुळे देशिकेंद्र विद्यालयाने यशाचे सातत्य कायम ठेवले आहे, असे गौरवोद्‌गार काढून अन्य संस्थाचालकांनीही सेवाभाव व कर्तव्यभावना जोपासावी, अशी अपेक्षा माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी व्यक्त केली.

श्री देशिकेंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक रुपसिंग सगर यांच्या सेवापूर्तीनिमित्त सोमवारी आयोजित कार्यक्रमप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे होते तर व्यासपीठावर सचिव माधवराव पाटील टाकळीकर, कोषाध्यक्ष विजयकुमारप्पा रेवडकर, सहसचिव सुनील मिटकरी, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक बसवराज येरटे, राजेश्वर बुके, बाबूराव तरगुडे, काशिनाथ साखरे, प्रा. जी. एम. धाराशिवे आदी उपस्थित होते.



यावेळी माजी मंत्री बसवराज पाटील म्हणाले, रुपसिंग सगर यांनी आपल्या पदाला न्याय दिला. कर्तव्यभावनेने शिक्षक तसेच मुख्याध्यापकाची भूमिका पार पाडली. त्यामुळे ते यशस्वी झाले. इतर संस्थांमधील शिक्षकांनीही कर्तव्यभावना जोपासावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी टाकळीकर म्हणाले, कार्यपूर्ती हीच खरी ईश्वरप्राप्ती आहे, हे लक्षात घेऊन या विद्यालयातील शिक्षक व कर्मचारी कार्पोरेट भावाने नव्हे तर सेवाभावाने कार्य करतात, असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या मनात घर निर्माण करणारा शिक्षक हाच खरा उत्कृष्ट शिक्षक असतो. संस्था अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी झोकून देऊन कार्य करावे, असे आवाहन आदिनाथ सांगवे यांनी केले.

## रोटरी सेंट्रलच्या अध्यक्षपदी खैरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या अध्यक्षपदी बाळासाहेब खैरे यांची तर सचिवपदी डॉ. नेताजी शिंगटे यांची निवड करण्यात आली आहे. रोटरीतर्फे सामाजिक उपक्रम राबविले जातात. तीच परंपरा कायम ठेवून याही वर्षी गरजूंसाठी शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केले जाणार आहेत, अशी माहिती नूतन अध्यक्ष खैरे यांनी दिली.

या वर्षीच्या कार्यकारिणीत नागेश स्वामी, विनोद पंडगे, हेमंत रामढवे, नंदकिशोर लोया, भालचंद्र थळकरी, पुष्पराज खुब्बा, राजकुमार मुंदडा, गिरीष ब्याळे, मेघराज बरबडे यांचा समावेश आहे. डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे, संजय बोरा व विश्वनाथ पंचाक्षरी आदिंनी अभिनंदन केले.

## 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज'साठी महापालिका आयुक्तांना साकडे



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १ जुलै -**
शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' पुतळ्याचे काम तत्काळ सुरू करावे आणि डॉ. आंबेडकर पार्कचे सुशोभीकरण करावे, या प्रमुख मागण्यांसाठी लोक प्रहार संघटनेने महापालिकेच्या नूतन आयुक्त मानसी मीना यांना निवेदन दिले.

संघटनेचे संस्थापक अजय सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने यापूर्वी मंजूर होऊनही रखडलेल्या पुतळ्याच्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच डॉ. आंबेडकर पार्कमध्ये भीमा कोरेगाव शौर्य स्तंभाची प्रतिकृती उभारण्याची, धोकादायक छत्रपती शिवाजी महाराज वाचनालय स्थलांतरित करण्याची, गूळ मार्केट येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महामार्गाची नामफलक बदलण्याची आणि तीन प्रमुख चौकांना त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर चौक, असे नाव देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

शिष्टमंडळात बिपीन शिंदे, रोहित सोनवणे, मनोज कदम, आकाश जाधव, शुभम आयवळे, बालाजी जाधव यांच्यासह संघटनेचे अन्य पदाधिकारी अणि कार्यकर्त्यांचा समावेश होता.

## माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



छत्रपती संभाजीनगर, दि.१ माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी प्रवीण फुलारी,व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी अभिवादन केले.

स्व. वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा केला जातो.महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा वापर, सिंचनाच्या पद्धतींचा विस्तार आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रचार करून त्यांनी राज्यात हरित क्रांती घडवून आणली. त्यांच्या जयंतीनिमित्त (१ जुलै) कृषी दिन साजरा केला जातो. त्यांच्या कार्यकाळात महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठांची स्थापना झाली, ज्यात राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ (१९६८), अकोला कृषी विद्यापीठ (१९६९), परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि दापोली येथील कोकण कृषी विद्यापीठाचा समावेश आहे. यामुळे शेतीत संशोधन आणि शिक्षणाला चालना मिळाली.जलसंधारणाच्या कामांवर त्यांनी विशेष भर दिला आणि पाझर तलाव व वसंत बंधाऱ्यांच्या निर्मितीचे श्रेय त्यांना दिले जाते. रोजगार हमी योजना सुरू करण्यात त्यांचे मोठे योगदान मानले जाते.लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने त्यांनी पंचायत राज समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले आणि त्यांचा २९३ पानांचा अहवाल महत्त्वाचा ठरला.वसंतराव नाईक हे एक दूरदृष्टीचे, संवेदनशील आणि शेतकऱ्यांशी जोडलेले नेते होते. त्यांना 'शेतकऱ्यांचे मुख्यमंत्री' आणि 'ग्रीन वॉरियर' म्हणूनही ओळखले जाते. दुष्काळात त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनवण्याचा संकल्प केला होता.

## टाटा मोटर्सकडून एस प्रो लॉंच

पुणे : टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लॉंचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. ३.९९ लाख रूपयांच्या सूरवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो. उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते.

## करूर वैश्य बँक आणि क्षेमा जनरल इन्शुरन्स यांची गेम-चेंजिंग बँकविमा भागीदारी

छत्रपती संभाजीनगर : करूर वैश्य बँक (केव्हीबी) आणि क्षेमा जनरल इन्शुरन्स लिमिटेड यांनी आज 'बँकविमा भागीदारी' जाहीर केली आहे. यामध्ये भारतातील ग्रामीण आणि कृषी-केंद्रित समुदायांसाठी विशेषतः तयार करण्यात आलेला दुहेरी लाभ देणारे 'क्षेमा किसान साथी' हे विमा उत्पादन सादर केले जाणार आहे. केव्हीबी चा ग्रामीण व निमशहरी भागांतील बँकिंग अनुभव आणि क्षेमाच्या तंत्रज्ञानाधारित विमा उपाययोजना या गोष्टी या भागीदारीतून एकत्र येणार आहेत. त्यातून लाखो ग्राहकांना एकात्मिक आर्थिक संरक्षणाची सुविधा मिळू शकेल. केव्हीबी ची ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाबाबतची दीर्घकालीन बांधिलकी या भागीदारीतून पुरेशी स्पष्ट होते. १०९ वर्षांची परंपरा लाभलेल्या करूर वैश्य बँकेने ग्राहकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करताना नेहमीच विश्वास आणि सेवेला अग्रक्रम दिला आहे. विशेषतः कृषी समुदायासाठी तयार केलेल्या या विमा उत्पादनामुळे बँकविमा क्षेत्रात एक नवा आणि दूरगामी टप्पा गाठण्यात आला आहे.

## एम.जी.एम. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात वृक्ष लागवड



छत्रपती संभाजी नगर - १ जुलै २०२५ रोजी एम.जी.एम. कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र कृषी दिन साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील कृषी क्रांतीला नवे आयाम देणारे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरामध्ये वृक्ष लागवड करुन कृषी दिन साजरा केला.राज्याच्या अर्थव्यवस्थेत आणि अन्न सुरक्षेत महत्वाची भूमिका बाजवणार्या शेतकरी व कृषी कामगारांच्या प्रयत्नांचे,योगदानाचे महत्व यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.आर.चव्हाण यांनी उपस्थितांना सांगितले. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक,सर्व प्राध्यापक आणि इतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.सचिन देसाई यांनी विशेष मेहनत घेतली.

# शाश्वत शेतीसाठी जमिनीच्या आरोग्यासह संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन गरजेचे

### कृषीदिनासह शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमात डॉ. पवार

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी - हवामान बदलानुसार शेती करायची असेल तर जमिनीचे आरोग्य, पाण्याचा संतुलित वापर आणि संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन या बाबींवर लक्ष देणे गरजेचे आहे. जमिनीची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत चालली असून, यामध्ये सुधारणा करण्यासाठी संतुलित आणि एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे सहयोगी संचालक (संशोधन) डॉ. सूर्यकांत पवार यांनी व्यक्त केले.



वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ कृषी विज्ञान केंद्र, जिल्हा परिषद, कृषी विभाग, आत्मा, इफको आणि कृभको यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त ०१ जुलै २०२५ रोजी कृषिदिन व ११२ वा शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी अध्यक्ष डॉ. पवार बोलत होते.

विभागीय कृषी सहसंचालक प्रकाश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी विद्यापीठाचे उपसंचालक (संशोधन) डॉ. हरिहर कौसडीकर ऑनलाईन सहभागी होते. जि. प. चे कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त शेतकरी, पीक स्पर्धेत उच्च उत्पादन घेणारे प्रगतशील शेतकरी तसेच केव्हीकेद्वारे मार्गदर्शित शेतकरी व महिला उद्योजिका यांचा सत्कार करण्यात आला. प्रकाश पाटील यांनी प्रास्ताविक , तर सूत्रसंचालन डॉ. अनिता जिंतूरकर यांनी केले. जिल्ह्यातील शेतकरी बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केव्हीकेचे सर्व कर्मचारी व रावेच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## अनिवासी भूखंडाच्या ई-लिलावाकरिता १७ जुलैपर्यंत मुदतवाढ

छत्रपती संभाजीनगर, दि.०१, (विमाका) :- गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा विभागीय घटक) मंडळातर्फे ०१ जून २०२५ रोजी ५२ अनिवासी भूखंडाच्या ई-लिलावाकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. ई-लिलावाकरिता ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या व ऑनलाईन पेमेंट स्विकृतीचा कालावधी मध्ये बदल करुन मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम ऑनलाईन भरणे यासाठी अंतिम दिनांक व वेळ १ जुलै, २०२५ होती. सुधारित दिनांक १७ जुलै, २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

ई-लिलावाकरीता आरटीजीएस, एनईएफटी द्वारे अनामत रक्कम भरण्याची अंतिम दिनांक १८ जुलै, २०२५ रोजीपर्यंत संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणा करावी. ई-लिलाव (ऑनलाईन बोली) २२ जुलै, २०२५ रोजी ११.०० वाजता सुरू होईल. ई-लिलाव ऑनलाईन बोली अंतिम वेळ दुपारी ५.०० वाजेपर्यंत राहील. ई-लिलावाचा एकत्रित निकाल २३ जुलै, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता जाहीर करण्यात येईल.

ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे इत्यादी करीता २ जुन, २०२५ रोजीच्या जाहिरातीमध्ये अन्य कोणताही बदल करण्यात आलेला नाही यांची नोंद घ्यावी असे मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार आरोपी अटकेत

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि १ फर्दापूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या टिटवी येथे १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे.याप्रकरणी सोमवार (दि.३०) आरोपी पती व पत्नी विरोधात फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

टिटवी ता.सोयगाव येथील निवृत्ती चिखले याने आपल्याच घरात राहणाऱ्या १४ वर्षीय अल्पवयीन भाचीवर नात्याचा गैरफायदा घेत तिच्या मर्जीशिवाय दि.२० जून ते २८ जून दरम्यान शारिरीक संबंध ठेवले.सदरील बाब ही आरोपीची पत्नी सविता निवृत्ती चिखले हिला माहीत असूनही तिने ती लपवून ठेवली.वारंवार होणारे अत्याचार असह्य झाल्याने पीडित मुलीने आपल्या मावशीला सांगितले व मावशी नातेवाईकांसोबत फर्दापूर पोलीस स्टेशन गाठत घडलेल्या घटनेची माहिती दिली.

पीडित अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरून आरोपी निवृत्ती चिखले व पत्नी सविता चिखले (रा.टिटवी ता.सोयगाव) यांच्या विरोधात बाललैंगिक संरक्षण अधिनियम कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. घटनेसंदर्भात अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक पाटील, पोलिस उपनिरीक्षक श्रीमती सुडके व पोलिस कर्मचारी करीत आहे

## श्रीराम तेलंग आणि केरोजी आचार्य यांचा 'समाजभूषण' पुरस्काराने गौरव

सिल्लोड प्रतिनिधी - स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित समाजभूषण, उद्योगरत्न व गुणवंत विद्यार्थी गौरव सोहळ्यात सामाजिक कार्यासाठी श्रीराम नारायणराव तेलंग आणि आदरणीय केरोजी आचार्य यांना 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी श्रीराम तेलंग यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, समाजभूषण पुरस्कार माझ्यासारख्या कार्यकर्त्याला सामाजिक कार्यासाठी नवसंजीवनी देणारा आहे. समाजावर अन्याय होईल तिथे मी आवाज उठवत राहीन.

कार्यक्रमात सिद्धी ऑटोचे संचालक महेश देगावकर यांना 'उद्योगरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला.



या वेळी संस्थापक अध्यक्ष विजयराव देवडे, प्रदेश कार्याध्यक्ष केरोजी आचार्य, सचिव शिवाजीराव पांगरेकर, उपाध्यक्ष व्यंकटेश गोत्रम, युवा कार्याध्यक्ष बालाजी घुमलवाड, मराठवाडा कार्याध्यक्ष माधव पदमपेंटे, जिल्हाध्यक्ष शिवानंद पासेवार, जिल्हाउपाध्यक्ष उत्तमराव मल्हारे, बालाजी निरदोडे ,किशोर जाधव जिल्हा पदाधिकारी व मराठवाडा विभागातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रा. प्रभाकर बाभुळगावकर, ह.भ.प. राम महाराज पांगरेकर, प्रा उत्तमराव मांजरमकर किशनराव येरमुरे, माजी नगरसेवक प्रल्हाद निमगावकर, उद्योजक जगन्नाथ मृगजळे आदींची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन अतिशय भव्य व सुसंघटित पद्धतीने करण्यात आले असून समाजातील कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारा कार्यक्रम ठरला.

## फार्मर आयडी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना विमा भरण्यासाठी पर्याय द्या : आ. बंब

छत्रपती संभाजीनगर : नवीन जमिनीधारक शेतकऱ्यांना फार्मर आयडी (ग्रीस्टॅक) उपलब्ध न झाल्यामुळे योजनां पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना विमा भरण्यासाठी तात्पुरता पर्याय उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार प्रशांत बंब यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे तसेच प्रधान सचिव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

दिलेल्या पत्रात म्हटले आहे की सध्या राज्यात ग्रीस्टॅक अंतर्गत शेतकऱ्यांना फार्मर आयडी निर्माण करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तथापि, अनेक शेतकरी ज्यांनी अलिकडेच जमिनी खरेदी केली आहे किंवा



वारसाहक्काने जमिनी मिळवली आहे, त्यांना अद्याप फार्मर आयडी प्राप्त झालेला नाही. त्यामुळे विविध अडचणी निर्माण होत असुन महाडीबीटी पोर्टलवरील विविध कृषी योजना भरणे खरीप हंगामासाठी पिक विमा भरण्यापासून शेतकरी वंचित असुन शासकीय मदतीपासून व योजनांपासून हजारो शेतकरी दूर राहण्याची शक्यता आहे. प्रणालीमध्ये नवीन जमिनींची नोंद व अद्ययावत माहिती अद्याप ग्रीस्टैंक प्रणालीशी संलग्न नसल्याने ही अडचण उद्भवत आहे. वारसाहक्क व नवीन खरेदीच्या आधारे शेतकऱ्यांच्या नावावर असलेल्या जमिनींची माहिती ग्रीस्टैंक प्रणालीमध्ये तातडीने समाविष्ट करण्याची प्रक्रिया राबवावी. तसेच फार्मर आयडी नोंदणीसाठी विशेष मोहीम आयोजित करून तालुका स्तरावर मदत केंद्रांची स्थापना करावी. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर त्याच प्रमाणे फार्मर आयडी नसलेल्या शेतकऱ्यांना तात्पुरता पर्याय उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून ते विमा योजनांचा लाभ घेऊ शकतील, अशी मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे.

## अकराव्या अजिंठा वेरूळ आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवानिमित्त शॉर्ट फिल्म स्पर्धेचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर, दि.१ : मराठवाड्यात जागतिक दर्जाचे लघुपट निर्माण व्हावे व मराठवाड्यातील युवा सिने विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, या प्रमुख हेतुने नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन व यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवानिमित्त मराठवाडास्तरीय शॉर्ट फिल्म (लघुपट) स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मराठवाडा आर्ट कल्चर अँड फिल्म फाउंडेशनच्या वतीने महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. केंद्रीय सुचना व प्रसारण मंत्रालय भारत सरकार, एनएफडीसी व महाराष्ट्र शासनाचे विशेष सहकार्य या महोत्सवास लाभलेले आहे. प्रोझोन मॉल व एमजीएम स्कूल ऑफ फिल्म आर्टस् हे सहआयोजक आहेत.

सदरील महोत्सव दि. २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ दरम्यान आयनॉस, प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार आहे. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांतील रहिवासी असलेल्या लघुपटाच्या निर्माता व दिग्दर्शकांसाठी ही स्पर्धा असेल. लघुपट जास्तीत जास्त ३० मिनिटांचा कालावधीचा असावा. तसेच लघुपटात दाखविला जाणारा सर्व तपशील हा स्वतः चित्रीत केलेला, मालकी असलेला किंवा परवानगी घेतलेला असावा. लघुपटाचे दिग्दर्शक अथवा निर्माते मराठवाड्यातील आठ जिल्ह्यातील रहिवासी असणे अनिवार्य आहे. लघुपटाची निर्मिती ही १ ऑगस्ट २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या काळातील असायला हवी. प्रवेशासाठी अंतिम दिनांक ३१ ऑक्टोबर २०२५ आहे. उत्कृष्ट लघुपटास रोख रु. २५,०००/- चे बक्षीस व स्मृतीचिन्ह प्रदान करण्यात येईल. या स्पर्धेतील निवडक शॉर्ट फिल्मचे प्रदर्शन महोत्सवात आयनॉस थिएटर मध्ये करण्यात येणार आहे. स्पर्धेस परिक्षक म्हणून चित्रपट क्षेत्रातील प्रसिद्ध मान्यवर उपस्थित राहतील.परिक्षकांचा निर्णय हा अंतिम असेल.

स्पर्धेकांनी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व अधिक माहितीसाठी www. aifilmfest.in या वेबसाईटला भेट देऊन आपले लघुपट सादर करावेत व अधिक माहितीसाठी सिद्धीका दळवी (दूरध्वनी : ०२४०-२४७८९०८) यांना संपर्क साधावा. असे आवाहन आयोजन समितीचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, मुख्य मार्गदर्शक अंकुशराव कदम, संचालक सुनील सुकथनकर, कार्यकारी संचालक चंद्रकांत कुलकर्णी, प्रोझोनचे कमल सोनी, महोत्सवाचे निमंत्रक नीलेश राऊत, जयप्रद देसाई, ज्ञानेश झोटिंग, शिव कदम आदींनी केले आहे.

## सभुमध्ये ऐनोद्दीन वारसी यांचे आज बासरीवादन

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी - सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या स. भु. कला व वाणिज्य महाविद्यालयातील संगीत विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून पं. रोणू मुजुमदार यांचे शिष्य आणि मराठवाड्यातील सुप्रसिद्ध बासरीवादक ऐनोद्दीन वारसी (देगलूर) यांचे बासरीवादन बुधवार, २ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी येथे संपन्न होणार आहे. वारसी यांना रुद्र केचे तबला साथसंगत करणार आहे. गेल्या दोन दशकापासून संगीतसेवा देणारे आणि वारकरी परंपरेतील संगीतधारा प्रवाहित ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे पंडित कृष्णा महाराज घायट यांचा सत्कार स. भु. शिक्षण संस्थेतर्फे या कार्यक्रमात केला जाणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, शहरातील सर्व संगीतप्रेमींनी याचा आस्वाद घ्यावा असे आवाहन स. भु. परिवारातर्फे करण्यात येत आहे.

## लातूरच्या श्लोकला ऑल इंडिया रँक ७१२ आणि श्वेतालाऑल इंडिया रँक ८९९

लातूर, चाचणी तयारी सेवांमध्ये राष्ट्रीय आघाडीची संस्था असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड ) ने अभिमानाने जाहीर केले की लातूर शाखेच्या श्लोकने नीट यूजी २०२५ मध्ये ऑल इंडिया रँक (ऑल इंडिया रँक) ७१२, तर श्वेताने ऑल इंडिया रँक ८९९ मिळवून अपूर्व यश संपादन केले आहे. ही कामगिरी त्यांच्या मेहनतीचे, शैक्षणिक शिस्तीचे आणि आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड कडून मिळालेल्या जागतिक दर्जाच्या मार्गदर्शनाचे प्रतिक आहे. निकालाची अधिकृत घोषणा काल राष्ट्रीय चाचणी एजन्सी ने केली. आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड लातूर शाखेतील श्लोक आणि श्वेता, हे दोघेही क्लासरूम प्रोग्रामचा भाग होते, जो नीट सारख्या कठीण वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी विशेषतः तयार करण्यात आला आहे. त्यांनी आपले यश आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड ने दिलेल्या मजबूत शैक्षणिक पाया, संकल्पनांची स्पष्टता आणि सातत्यपूर्ण व शिस्तबद्ध अभ्यासक्रमाला दिले आहे. या संपूर्ण प्रवासात आकाशने मला योग्य मार्गदर्शन दिले, त्यासाठी मी खूप आभारी आहे.

### जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधीश साहेब (क. स्तर) गंगाप्र यांचे न्यायालयात**

सिव्हील एम्.ए. क्र. ४०७/२०२५ पु.ता. २५/७/२५

अर्जदार : १) शिवगंगा भ्र. दत्ता चौधरी, वयः ३३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. येसगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद सध्या सावता महाराज मंदिराजवळ, माळी गल्ली, मु.पो. शेवली, ता. व जि. जालना २) वैष्णवी पिता दत्ता चौधरी, वयः १३ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे अजान पालनकर्ती आई अर्जदार क्र. १ ३) नेहा पिता दत्ता चौधरी, वयः १९ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क्र. १ ४) नेहा पिता दत्ता चौधरी, वयः ११ वर्षे, धंदाः शिक्षण, रा. वरील प्रमाणे अज्ञान पालनकर्ती आई अर्जदार क्र. १

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री पी.डी. देशपांडे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सदर केला असून त्यातील कथन की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ४ यांचे पिता नामे दत्ता किसन चौधरी हे दि. १२/१२/२०१९ रोजी मयत झाले असून यांना अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही म्हणून त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी विनंती केली आहे.

त्याआर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येते की सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा उजर किंवा आक्षेप हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तिक किंवा त्यांचे विधीज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र जारी करेल. करिता हे जाहीर प्रगटन आज दि.०१/०७/२०२५ आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय (क.स्तर) गंगापूर

### जाहिर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९६/२०२५.

१. प्रमिलाबाई विठ्ठल सोहनी, वय ८० वर्षे, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. जनार्धन विठ्ठल सोहनी, वय ४३ वर्षे, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ३. भरत विठ्ठल सोहनी, वय ४१ वर्षे, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत विठ्ठल शामजी सोहनी यांचा दिनांक २३/०९/२०२४ रोजी सोयगांव, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत विठ्ठल शामजी सोहनी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०१/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता. ३१/०७/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १९८/२०२५.

१. ममताबाई लक्ष्मण चव्हाण, वय ७९ वर्षे, रा. नांदा तांडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर २. रमेश लक्ष्मण चव्हाण, वय ४३ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ३. सुरेश लक्ष्मण चव्हाण, वय ४२ वर्षे, रा. वरीलप्रमाणे. ४. मुकेश लक्ष्मण चव्हाण, वय ३२ वर्षे, रा. वरीलप्रमाणे, ५. रेखाबाई गजानन जाधव, वय ३४ वर्षे, रा. चारुतांडा, ता सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर. ६. रेणुबाई साहेबराव राठोड, वय ३३ वर्षे, रा. देव्हारी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत लक्ष्मण गणपत चव्हाण यांचा दिनांक २२/०८/२०२२ रोजी नांदातांडा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत लक्ष्मण गणपत चव्हाण यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ०१/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता. ०२/०८/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहिर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १७९/२०२५.

१. अश्विनी प्रविण भोकरे, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. गोंदेगांव, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. पुष्पाबाई सुधाकर भोकरे, वय ६७ वर्षे, धंदा व रा वरीप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड, संजीव नैनाव यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत प्रविण सुधाकर भोकरे यांचा दिनांक १२/११/२०२४ रोजी घाटी रुग्णालय औरंगाबाद येथे मृत्यु झ् गालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ व २ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ व २ हे मयत प्रविण सुधाकर भोकरे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय व अनुकंप करीता वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ३०/०६/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता. २८/०७/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

### जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधीश साहेब (क, स्तर) गंगापूर यांचे न्यायालयात**

सिव्हील एम्.प. क्र. ३६९/२०२५

अर्जदार : १) मुक्ताबाई भ्र. मदन चव्हाण, वयः ४५ वर्ष, धंदाः घरकाम, रा. भिवधानोरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद २) नंदाबाई अ. मदन चव्हाण, वयः ४० वर्ष, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे ३) ओंकार पिता मदन चव्हाण, वयः १९ वर्षे, धंदाः नोकरी, रा. अगरवडगाव, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) रामेश्वर पिता मदन चव्हाण, वयः अजान, धंदाः शिक्षण, रा. शिवधानोरा, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद अजान पालनकर्ती आई अर्जदार क्र. २ नंदाबाई ४. मदन बव्हाण

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळण वाचत.

सर्व जनतेस कळविण्यात येते कि, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज ॲड. श्री पी.डी. देशपांडे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र निळणे कामी अर्ज सदर केला असून त्यातील कथन की, अर्जदार क्र. १ ते २ यांचे पती व अर्जदार क्र. ३ व ४ यांचे पिता नाने मदन पिता कचरू चव्हाण हे दि. १९/०३/२०२५ रोजी मयत झाले असून यांना अर्जदारांचे व्यतिरिक्त इत्तर कोणीही वारस नाही म्हणून त्यांनी वारस प्रमाणपत्र मिळणेकामी विनंती केली आहे.

त्याआर्थी सर्व जनतेस सूचित करण्यात येत की सदर प्रकरणाशी कोणाचाही काही उजर किंवा आक्षेप असल्यास त्यांनी त्यांचा उजर किंवा आक्षेप है प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात वैयक्तिक किंवा त्यांचे विधीज्ञांमार्फत नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर किंवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांचे विनंती प्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र जारी करेल. करिता हे जाहीर प्रगटन आज दि. ०१/०७/२०२५ आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

कनिष्ठ लिपिक सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय (क.स्तर) गंगापूर

## अग्रलेख...

# पाकिस्तान नावाचे गळके घर

आपल्याला एखादे काम नीट जमत नसेल तर त्याचा दोष इतरांवर ढकलणे ही काही माणसांची रीतच असते. अशा माणसांना आत्मपरीक्षण करणे जमत नाही. त्याचा साधा विचारही त्यांच्या मनात येत नाही. पाकिस्तानची रीत तशीच. पाकिस्तानात काहीही झाले की, आत्मपरीक्षणाचा विचारही न करता, काहीही झाले तरी, भारताकडे बोट दाखविणे हा पाकिस्तानचा स्वभावच झालाय. बलुचिस्तानमध्ये काही झाले तरी भारताकडे बोट, कराचीत काही घडले तरी तेच आणि आता २८ जून रोजी वजिरिस्तानात झालेल्या आत्मघाती हल्ल्यात तिथल्या सैनिकांचे जीव गेले तरी भारताला दोष. भारताने पाकिस्तानचा हा आरोप नाकारला आहेच. शिवाय, पाकिस्तानातील एका दहशतवादी संघटनेने वजिरिस्तानमधील घटनेची जबाबदारीही स्वीकारलेली आहे. तरीही पाकिस्तानचे जुनेच रडगाणे नव्याने सुरू झालेले आहे. एव्हाना पाकिस्तानचा स्वभाव साऱ्या जगाला ठावूक झालेला आहे. परंतु, गिरे तो भी टांग ऊपर या न्यायाने त्याचे भारताकडे बोट दाखवणे आणि स्वतःच्या गळक्या घराकडे दुर्लक्ष करणे सुरूच आहे. खरे तर पाकिस्तानचे खरे शत्रू सीमेपलीकडे नाहीत तर त्या देशाच्या भूगोलात रुजलेले आहेत. त्या देशाच्या इतिहासातून त्याच देशाचे शत्रू निर्माण झाले आणि सध्याची राज्य व्यवस्था तिथे स्वतःच्याच देशाचे अधिकचे शत्रू निर्माण करणारी आहे. पाकिस्तानच्या आदिवासी प्रदेशांमध्ये, तालिबान-बाधित वायव्येकडील रावळपिंडीच्या प्रदेशात, अस्वस्थ बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानच्या विद्यमान व्यवस्थेचे विरोधक आधीपासून आहेत. ते वाढत आहेत. यातले काही सनदशीर मार्गाने आंदोलन करतात, काही बॉम्बस्फोट घडवितात. लष्करशाहीला सरकारचे पाठबळ आहे आणि सरकारमध्ये लष्कराचा हस्तक्षेप आहे. दोघेही मिळून दडपशाही करतात. तिथल्या लष्कराला अहंगंडाने आणि सरकारला नाकर्तेपणाने ग्रासले आहे. २८ जून रोजी मीर अली येथे झालेला हल्ला ही फार वेगळी घटना नव्हती. कथित इस्लामिक गणराज्याच्या सीमेवर झालेल्या स्फोटांच्या मालिकेतील हा नवीन प्रकार होता एवढेच. हाफिज गुल बहादूरच्या गटाने त्याची जबाबदारी स्वीकारली आहे. त्याच्याशी भारताचा कोणताही संबंध नाही, अफगाणिस्तानचाही नाही. गेल्या काही महिन्यांत फक्त खैबर पख्तूनख्वा आणि बलुचिस्तानमध्ये दहशतवादी हल्ल्यांमध्ये तीनेकशे लोकांचे बळी गेले असून, त्यातील बहुतेक सुरक्षा जवान आहेत. सामान्यांच्या जिवांची तर नोंदही नाही. गेल्या वर्षीच्या तुलनेत पाकिस्तानमध्ये दहशतवादी कारवायांमध्ये दीड पट वाढ झाली आहे. पाकिस्तान भारतासह इतर देशांमध्ये दहशतवादी व दहशतवाद निर्यात करतो, तो बिझनेस वेगळा. त्यामुळेच पाकिस्तानला जागतिक दहशतवादाच्या निर्देशांकात (ग्लोबल टेररिज्म इंडेक्स-२०२५) मध्ये दुसरा क्रमांक मिळाला आहे. पाकिस्तान बाकी कशातही पुढे नाही, पण दहशतवाद्यांच्या निर्मितीत आणि दहशतवादात निश्चितच तो जागतिक दर्जाचा देश आहे. १९४७ मध्ये भारतासोबत स्वतंत्र झालेला हा देश. खरे तर फाळणीतून जन्मलेला. दोघांची वाटचाल लोकशाहीच्या मार्गाने सुरू झाली. लोकशाहीच्या मार्गाने चालत भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. संविधान व लोकशाहीचा जागर करीत मार्गक्रमण करीत असलेल्या भारताचा जगभरात बोलबाला आहे. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, आरोग्य, नवोपक्रम, स्टार्ट अप्स, सॉफ्टवेअर, हार्डवेअर, ऑटोमोबाईल, एविएशन अशा सर्व क्षेत्रांत भारताची घोडदौड सुरू असताना पाकिस्तान नावाचे जगाच्या झाडावरचे बांडगुळ अंतर्गत कलहाने ग्रस्त झालेले आहे. अशात त्याने आपण अतिरेक्यांच्या हातचे बाहुले झालो कसे असे स्वतःला विचारायचे आणि त्यावर उपाय करायचे तर भारताकडे बोट दाखविण्यात हा देश धन्यता मानतो हे नवलच आहे.

पाकिस्तानचे शासनाच्या मॉडेलमध्ये सक्रिय लोकशाही कमी किंवा अत्यल्प उरलेली आहे. खाकी गणवेशातील लष्करशहा आणि मायक्रोफोन घेऊन फिरणारे मुल्ला-मौलवी यांनी तिथल्या लोकशाहीचे जवळजवळ अपहरण केलेले आहे. तिथे लोकशाहीपेक्षा धर्मशाही अधिक आहे. तिथले मौलवी केवळ सामाजिकदृष्ट्या प्रभावशाली नाहीत, ते राजकीय नेते बनले आहेत. त्यांचा धर्म-अध्यात्माशी संबंध येतो तो जिहादी मानसिकतेचा प्रचार-प्रसार करण्यापुरता. त्यांचे फतवे धोरणात्मक निर्णय म्हणून पाहिले जातात आणि ईशनिंदेचे कायदे अस्त्र म्हणून वापरले जातात. याहूनही वाईट आहे ती पाकिस्तानातील आदिवासी पट्ट्याची स्थिती. विविध गटांतील कलह, बेकायदेशीर व्यापार, धार्मिक अतिरेकाची शिकवण आणि दहशतवाद्यांच्या सुरक्षित आश्रयस्थानांचा हा परिसर बनला आहे. हा सारा पट्टा अद्याप मध्ययुगीन मानसिकतेत वावरणारा. उत्तर वजिरिस्तान हा पाकिस्तानचाच भाग आहे. तिथे अनागोंदी आणि हिंसेचे राज्य. गिलगिट-बाल्टिस्तान, बलुचिस्तान या भागांतही अस्वस्थता आहे. तथाकथित 'आझाद काश्मीर' (व्याप्त काश्मीर)मध्ये स्वातंत्र्य नावाची वस्तू अस्तित्वात नाही. पाकिस्तान हा बाह्य आक्रमणाने ग्रस्त असलेला देश नाही. तो अंतर्गत विरोधाभासांनी गोंधळलेला, भरकटलेला देश आहे. आपण लोकतांत्रिक देश आहोत, असे जगाला भासवीत असताना वास्तवात लष्कराचे राज्य असलेले हे राष्ट्र. दहशतवादाच्या निर्यातीसाठी कुख्यात असलेले हे राष्ट्र. भारताला पाकिस्तानमध्ये हस्तक्षेप करण्याची गरजच नाही. ज्याला स्वतःचे भले कळत नसेल, त्याचे वाईटच होणार आणि स्वतःचे वाईट करण्यात पाकिस्तानला जगातील कोणत्याही देशाची मदत गरजेची नाही. पाकिस्तानला देश म्हणून टिकून राहायचे असेल तर तिथल्या शासकांनी आत डोकावून पाहिले पाहिजे. तिथे मुल्ला-मौलवी आणि लष्कर यांच्यातील साटेलोटे संपुष्टात आणले पाहिजे. भारताविरुद्ध छुपी युद्धे लढणे थांबवून त्यावरील पैसा विकासासाठी खर्च केला पाहिजे. ड्रोन हल्ले आणि पोकळ भाषणांपेक्षा तिथल्या आदिवासी नागरिकांना काहीतरी अधिक दिले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वतः लावलेल्या प्रत्येक आगीसाठी भारताला दोष देणे थांबविले पाहिजे. बलुचिस्तान हा पाकिस्तानचा सर्वांत गरीब, सर्वांत कमी विकसित आणि सर्वांत जास्त लष्करी प्राबल्य असलेला प्रांत आहे. गेल्या काही वर्षांत हजारो बलुच पुरुष गायब झाले आहेत. ते पाकिस्तानच्या कुप्रसिद्ध ''मारा आणि फेकून द्या'' धोरणाचे बळी आहेत. लोक गुप्तचर यंत्रणांना घाबरतात कारण त्या यंत्रणा नागरी स्वातंत्र्याचा उच्चार करणाऱ्यांना देशाच्या शत्रूसारखे वागवितात. तेथील संसाधने इस्लामाबादेतील उच्चभ्रूंना इंधन पुरवत आहेत आणि स्थानिक लोक उपाशी आहेत. अख्खा सिंध प्रांत, विशेषतः कराची व भोवतालचा नागरी परिसर, राजकीय हेराफेरी आणि आर्थिक शोषण यांनी ग्रस्त आहे. वांशिक मुहाजिरांना पद्धतशीरपणे दुर्लक्षित केले जाते, तर सिंधी राष्ट्रवादी मुखंड त्यांच्या नैसर्गिक संसाधनांवर अधिक नियंत्रणाची मागणी करतात. गिलगिट-बाल्टिस्तानचा प्रदेश, जो संवैधानिक अधिकारांशिवाय प्रशासित केला जातोय आणि वसाहतवादी व्यवस्थेनुसार त्याच्यावर अंकुश ठेवला जातोय. हे सारे जगाला माहिती आहे. भारताला ते दिसते. पाकिस्तानातील पत्रकार-लेखक-विचारवंतांनाही दिसते. फक्त तिथल्या सरकारला, लष्करशहांना आणि मुल्ला-मौलवींना आपल्याच देशातल्या लोकांचे हे असे जगणे दिसत नाही. त्यातून अस्वस्थता जन्माला येते आणि दहशतवाद्यांना पाठबळ मिळत असते. जी व्यक्ती स्वतःचे घर व्यवस्थित सांभाळू शकत नाही, त्याला बोट दाखवण्याचा कोणताही अधिकार नाही, हे व्यवहाराचे साधे सूत्र पाकिस्तानला कळत नाही. पाकिस्तानला खरोखर शांतता हवी असेल, तर त्याने मध्ययुगीन धर्मशाहीप्रमाणे राज्य करणाऱ्या व्यवस्थेचा अंत केला पाहिजे. आपल्या प्रांतांना सक्षम बनवले पाहिजे, अल्पसंख्यकांचा आदर केला पाहिजे आणि भारतासह इतर देशांना त्रास देत असलेल्या जिहादी मानसिकता व गटांपासून स्वतःला वेगळे केले पाहिजे. इतरांकडे बोट दाखवून स्वतःचे गळके घर दुरुस्त करता येत नाही, त्यासाठी स्वतःच छतावर चढून छिद्रे बुजवावी लागतात हे पाकिस्तान ज्या दिवशी शिकेल, तो सुदिन...त्याच्यासाठी आणि जगासाठी देखील!

## आंतरराष्ट्रीय

# ओमानचे 'करदायी' पाऊल

**प्रा. जयसिंग यादव**

आखाती देशांमध्ये प्रथमच ओमानने आपल्या नागरिकांवर प्राप्तिकर लादण्याचा निर्णय घेतला आहे. ओमान सरकारच्या घोषणेनुसार, २०२८ पासून वार्षिक उत्पन्न १,०९,००० डॉलर किंवा त्याहून अधिक असणाऱ्यांकडून पाच टक्के प्राप्तिकर वसूल केला जाणार आहे. अशा प्रकारे सध्या ओमानच्या फक्त एक टक्के लोकांकडून उत्पन्न कर वसूल केला जाईल. ओमानशिवाय इतर आखाती देश त्यांच्या नागरिकांवर कर लादण्याचा विचार करत आहेत की नाही हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने असे भाकीत केले आहे की येत्या काही वर्षांमध्ये आखाती देश उत्पन्नात विविधता आणण्यासाठी नागरिकांकडून कर आकारण्यास सुरुवात करतील. सध्या ओमानचा ८५ टक्के महसूल तेल उद्योगातून येतो. आखाती देशांमध्ये कोणताही कर लागत नसल्यामुळे जगभरातील लोक या देशांकडे आकर्षित झाले आणि गुंतवणूक केली. ओमानच्या अर्थमंत्र्यांनी सांगितले की, जागतिक ऊर्जा बाजारपेठांमधील चढउतारामुळे ओमानने तेलावरील आपले महसूल अवलंबित्व कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ओमानचा ८५ टक्के महसूल तेल आणि वायूच्या विक्रीतून येतो. ओमान बऱ्याच काळापासून नागरिकांवर उत्पन्न कर लादण्याचा विचार करत होता. २०२० मध्ये ओमानने आपल्या अर्थव्यवस्थेत अनेक बदल केले. त्यात जनतेवरील कर्ज कमी करणे आणि आर्थिक वाढीला चालना देण्याचा विषय समाविष्ट होता. ओमान आपल्या २०४० पर्यंतच्या नियोजनांतर्गत हे बदल करत आहे. ओमान आपल्या देशाची अर्थव्यवस्था तंत्रज्ञानावर आधारित बनवू इच्छितो.

ओमान हा 'गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल' (जीसीसी)चा पहिला सदस्य बनणार आहे, जिथे जास्त उत्पन्न असलेल्या लोकांना उत्पन्न कर भरावा लागेल. सरकारच्या घोषणेनुसार ४२ हजार ओमानी रियाल (सुमारे ९३.५ लाख रुपये) पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्नावर पाच टक्के कर आकारला जाईल. हा कर ओमानी नागरिकांसह देशात काम करणाऱ्या परदेशी लोकांनाही लागू होईल. 'जीसीसी'चे उर्वरित पाच सदस्य देश तेल आणि वायूने समृद्ध आहेत आणि तिथे वैयक्तिक उत्पन्नावर कोणताही कर आकारला जात नाही. या करमुक्त वातावरणामुळे सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतारसारखे देश परदेशी कामगारांसाठी आकर्षक बनतात. २०२४ मध्ये ओमानच्या एकूण सरकारी उत्पन्नाचा मोठा भाग म्हणजे सुमारे १९.३ अब्ज डॉलर तेलातून आले; परंतु अर्थमंत्री सईद बिन मोहम्मद अल-सकरी म्हणतात की, या नवीन करामुळे सरकारी महसुलाच्या स्रोतांमध्ये विविधता येईल आणि तेलावरील अवलंबित्व कमी होईल. ओमानकडे इतर आखाती देशांपेक्षा कमी संसाधने आहेत. त्यामुळे अंतर्गत आणि बाह्य दबावांमुळे हा कर लागू करण्यात आला आहे. अनेक दशकांपासून कच्च्या तेलावर अवलंबून राहिल्यामुळे ओमानच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या चढ-उतारांना सामोरे जावे लागत आहे. सार्वजनिक कर्जात वाढ आणि कल्याणकारी योजनांवरील वाढता खर्च हीदेखील यामागील कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या संस्थांच्या शिफारशींमुळे ओमानला पारदर्शक आर्थिक सुधारणांकडे वाटचाल करण्यास प्रेरणा मिळाली. हा निर्णय ओमानमध्ये आधीच लागू असलेल्या व्यापक कर रचनेचा भाग बनेल. ओमानमध्ये आधीच चार प्रकारचे कर लागू आहेत, ते म्हणजे मूल्यवर्धित कर (व्हॅट), कॉर्पोरेट कर, उत्पादन शुल्क कर आणि मिठाईवरील कर. उत्पन्न कर हा या प्रणालीतील शेवटचा आणि आवश्यक दुवा आहे. या कायद्यानुसार, ४२ हजार ओमानी रियालपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्यांना करातून सूट दिली जाईल. त्यामुळे ९९ टक्के लोकसंख्येला नव्या करापासून दूर ठेवले जाईल. यामुळे मध्यम आणि निम्न उत्पन्न गटांवर कोणताही भार पडणार नाही. तथापि, या कराचे काही नकारात्मक परिणामदेखील होऊ शकतात. काही लोक कर टाळण्यासाठी देश सोडून जाऊ शकतात आणि परकीय गुंतवणूकदेखील कमी होऊ शकते; परंतु यामुळे ओमानची आर्थिक पारदर्शकता वाढेल आणि सरकारी खर्चात सुधारणा होईल. सरकारने व्यवसायावर परिणाम न करणाऱ्या करांसह काही सूट आणि प्रोत्साहने द्यावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. उदाहरणार्थ, स्टार्टअप्स, नवोन्मेष आणि परदेशी गुंतवणुकीला कर सवलत देणे. अर्थात आणखी एक भीती आहे, ती म्हणजे लोक कर चुकवण्याचे मार्ग शोधतील. विशेषतः मर्यादित आकाराच्या अर्थव्यवस्थेत देखरेख यंत्रणा मजबूत नसलेल्या ओमानसारख्या देशात हे सहजशक्य आहे. आता ओमानमध्ये काही लोक कर टाळण्यासाठी अकाऊंटंट शोधू लागले आहेत. या करामुळे परदेशी गुंतवणुकीवर परिणाम होऊ शकतो आणि ओमानमधून भांडवल बाहेर जाऊ शकते. खऱ्या श्रीमंतांकडून कर वसूल करणे आव्हानात्मक असेल. कारण ते अनेकदा आपले भांडवल परदेशात पाठवतात.



आखाती सहकार्य संघटनेच्या उर्वरित सदस्य देशांमध्ये उत्पन्न कराची कोणतीही तरतूद नाही. २०२४ साठी ओमानचा एकूण अर्थसंकल्प सुमारे ३०.२६ अब्ज डॉलर होता. २०२८ पासून लागू होणाऱ्या उत्पन्न करातून मिळणारा अंदाजे महसूल फक्त २३० दशलक्ष डॉलर असेल. कराची उपयुक्तता केवळ आर्थिक फायद्यांमध्येच नाही, तर चांगली देखरेख, डेटा आणि व्यवस्थापनातही आहे. कर पारदर्शक आणि समान पद्धतीने अंमलात आणला गेला, तर सामाजिक न्यायाचे एक महत्त्वाचे साधन बनू शकतो. केवळ उच्च उत्पन्न असलेल्यांवर कर लावल्याने आर्थिक जबाबदारीचे संतुलन दिसून येते; परंतु शिक्षण, आरोग्य आणि राहणीमान सुधारण्यासाठी कर उत्पन्न वापरले जाणे महत्त्वाचे आहे; जेणेकरून लोकांना आपण देशाच्या विकासात योगदान दिले आहे, असे वाटेल. ओमान हे धोरण यशस्वीरीत्या अंमलात आणू शकला, तर ते इतर आखाती देशांसाठी एक उदाहरण बनू शकते.

काही तज्ज्ञांचा विश्वास आहे की, विद्यमान कररचनेत सुधारणा करणे हा अधिक व्यावहारिक आणि कमी धोकादायक पर्याय आहे. ओमानच्या या उपक्रमाकडे आता संपूर्ण आखाती प्रदेशात कुतूहलाने पाहिले जात आहे. हे धोरण सामाजिक आणि आर्थिक गरजांसह आर्थिक संतुलन साधण्यात यशस्वी झाल्यास आखाती देशांच्या कर धोरणात एक मोठा बदल ठरू शकते. बहुतेक 'जीसीसी' देशांची आर्थिक स्थिती मजबूत आहे. या वर्षी फक्त सौदी अरेबिया आणि बहरीनमध्येच तूट येण्याची शक्यता आहे; परंतु आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने म्हटले आहे की या देशांनाही उत्पन्न कराची आवश्यकता असू शकते. याचे कारण म्हणजे जीवाश्म इंधनाची जागतिक मागणी कमी होत आहे. ओमान तेल उत्पन्नावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सुधारणा करत आहे. हे इतर आखाती देशांसारखेच आहे. ओमानने खाजगीकरणाद्वारे पैसे उभारले आहेत. यामध्ये गेल्या वर्षी त्यांच्या सरकारी ऊर्जा कंपनीच्या शोध आणि उत्पादन युनिटच्या दोन अब्ज डॉलर आयपीओ (प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग)चा समावेश आहे. हा एक विक्रम आहे. ओमानने उत्पन्न कर लादल्याने भविष्यात इतर 'जीसीसी' देशांनाही कर लादण्यास प्रेरित करता येईल. आतापर्यंत आखाती देशांमध्ये कोणताही उत्पन्न कर नव्हता. याचा फायदा तेथे काम करणाऱ्या परदेशी कर्मचाऱ्यांना होत होता; परंतु आता ओमानने हा बदल केला आहे. यामुळे इतर देशांवरही असेच करण्याचा दबाव वाढू शकतो.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# पर्यटकांचे आकर्षण लोणार सरोवर

**नितीन शिरसाट**

जागतिक दर्जाचे खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर वन्यजीव अभयारण्यामध्ये देशात दहाव्या आणि राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोणार अभयारण्य विदर्भ, मराठवाड्याच्या सीमेवर असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात आहे. हे अभयारण्य ३६५ हेक्टरमध्ये पसरलेले असून जिल्ह्यातील सर्वांत लहान अभयारण्य आहे. लोणार सरोवर उल्कापातामुळे तयार झालेले जगातील एकमेव सरोवर आहे. वन व्यवस्थापन अभ्यास समितीने देशातील संरक्षित जंगलांचे व्यवस्थापन चार गटांमध्ये वर्गीकृत केले आहे. त्यात लोणार 'उत्तम' गटात आले आहे. या गटात ८४ जंगलांचा समावेश आहे. विशेष म्हणजे महाराष्ट्रातील कोणतेही अभयारण्य वाईट गटात नाही, ही राज्याच्या वन पर्यटनाच्या दृष्टीने आनंदाची बाब म्हणावी लागेल. नुकत्याच झालेल्या एका अहवालात देशातील ४३८ राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्यांचे व्यवस्थापन तपासण्यात आले, ज्यामध्ये लोणार अभयारण्याचे दहावे स्थान निश्चित झाले. हे अभयारण्य लोणार सरोवराच्या परिसरात आहे आणि या सरोवराच्या जतन व संवर्धनासाठीच या परिसरास वन्यजीव अभयारण्याचा दर्जा देण्यात आला आहे. भारतीय वन्यजीव संस्थान आणि केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने याबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. यंत्रणेने देशभरातील वन्यजीव अभयारण्याचा नुकताच आढावा घेतला. यामध्ये रामसर हा जागतिक कीर्तीचा दर्जा प्राप्त असलेल्या लोणार अभयारण्याचा देखील समावेश होता. देशभरातील ४३८ राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्याचे मूल्यमापन करण्यात आले. विविध जंगलांचे व्यवस्थापन कशा प्रकारे केले जाते. याचा अभ्यास गत पाच वर्षांमध्ये करण्यात आला. यामध्ये उत्तम स्थिती ही ८४ ठिकाणी आढळून आली तर वाईटचा शेरा देखील १८ अभयारण्यांच्या वाट्याला आल्याची माहिती सूत्राने दिली आहे.



लोणार हा पर्यटनदृष्ट्या विकसित करण्यासाठी शासकीय पातळीवर आराखडा घोषित झाला आहे. जगभरातून पर्यटकांना बुलढाणा जिल्ह्यात खेचून आणण्याची क्षमता असलेल्या या लोणार सरोवर परिसरातील वनसंपदेच्या अनुषंगाने पर्यटन विस्ताराच्या सुविधा निर्माण होणे आवश्यक आहे. हे कधी होईल हा खरा प्रश्न मात्र सध्या अनुत्तरितच आहे. मात्र असे असले तरी देशभरातील अभयारण्य उत्तम व्यवस्थापनामध्ये लोणारचा दहावा क्रमांक लागणे ही बाब नक्कीच स्वागतार्ह आहे. या सरोवराचे जतन आणि संवर्धन व्हावे यासाठी ८ जून २००० साली या परिसरास लोणार वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. परिसरात खूप प्राचीन अशी मंदिरेही आहेत. काही मंदिरे विवरातच आहेत. हेमाडपंथी स्थापत्यशैली असलेली ही मंदिरे आपल्याला आकर्षित करतात. अंडाकृती आकार असलेल्या या सरोवराची ६० हजार वर्षांपूर्वी निर्मिती झाली असावी असे तज्ज्ञ सांगतात. सरोवराचे पाणी खूप खारट असले तरी त्याच्या एका बाजूने एक सतत वाहणारा स्वच्छ असा गोड्या पाण्याचा झरा आहे. जवळपास १५० मीटर खोलीचे असे हे विवर आहे. लोणार सरोवराच्या जतनासाठी व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे.

यापूर्वी लोणार सरोवराच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी ३७० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या निधीमधून सरोवराचे जतन, संवर्धन, पर्यटन सुविधा वाढवणे आणि परिसरातील जैवविविधतेचे संरक्षण करणे अपेक्षित आहे. १५ कोटी रुपयांचा निधी सरोवराच्या संपादनासाठी मागण्यात आला होता. सरोवराच्या विकासासाठी २०५ कोटी १२ लाखांचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. केंद्र व राज्य सरकारने लोणारला पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याची योजना आखली आहे. दरवर्षी पर्यटन महोत्सव आयोजित करण्याची सरकारची योजना आहे. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही फायदा होईल. सरोवर परिसरातील प्रोसोपिस आणि आक्रमक तणांचे निर्मूलन, निसर्ग व्याख्या केंद्राचे उन्नतीकरण आणि पुनर्स्थापन, जुन्या न वापरण्यात येणाऱ्या इमारतींचा सृजनशील पुनर्वापर, पर्यावरणपूरक संरचना आणि योग्य निसर्ग मार्गाची रचना, क्षेत्रीय योजनांची आखणी, वन्यजीव संपत्ती, पाण्याचे स्रोत आणि पर्यावरणीय अभ्यासास येथे वाव असल्याच्या सुधारणा सुचविण्यात आल्या. मानांकनामुळे निसर्गाचा चमत्कार वैज्ञानिकदृष्ट्या जागतिक दर्जाच्या या सरोवराचे जतन संवर्धन भविष्यातील संशोधकांना मोलाचा ठेवा राहणार आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

# उत्पादन क्षेत्रात महिलांची भरारी

**दत्तात्रेय आंबुलकर**

ऐतिहासिक संदर्भात व परंपरागतरीत्या उत्पादन क्षेत्र हे पुरुष उमेदवारांचा प्रभाव आणि वर्चस्व असणारे समजले जात असे. मात्र, बदलती परिस्थिती, उपलब्ध कौशल्यप्राप्त कर्मचाऱ्यांचे प्रमाण व त्यांची टक्केवारी व व्यावसायिक स्पर्धेसह कौशल्य असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतेसाठी विविध कंपन्यांनी, विविध पुढाकारांसह गेल्या काही वर्षांत प्रयत्न सुरू केले असून, त्यांचे परिणाम आता दिसू लागले आहेत.

भारतीय उत्पादन कंपन्यांमध्ये आघाडीवर असणाऱ्या व मोठ्या संख्येत कर्मचार्यांची नेमणूक करणाऱ्या लार्सन ॲण्ड टुब्रो, टाटा स्टील, महिंद्र उद्योग समूह, सिएट टायर्स व हनीवेल या आणि यांसारख्या अन्य मोठ्या कंपन्यांनी आपल्या कंपन्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी काही धोरणात्मक निर्णय घेऊन विशेष प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

वानगीदाखल सांगायचे झाल्यास, वरील कंपन्यांसह विविध कंपन्यांनी त्यांच्याकडे सध्या असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची संख्या कायम ठेवत असतानाच, बदलती स्थिती, गरजा आणि व्यावसायिक-कामकाज या साऱ्याला पूरक अशी भूमिका घेऊन महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यावर भर देण्यास सुरुवात केली आहे.यामध्ये प्रामुख्याने महिला कर्मचाऱ्यांच्या तान्ह्या वा लहान मुलांसाठी पाळणाघर व अशा लहान मुलांची कामाच्या ठिकाणी काळजी घेण्यासाठी आवश्यक त्या सुविधा व कर्मचारी ठेवणे, महिला कर्मचाऱ्यांसाठी लवचीक व सोयीस्कर कामाचे तास ठेवणे, यासंदर्भातील गरजू महिलांना बाळांचे आरोग्य, संगोपन, बालकांचे खानपान, स्वतःसह बाळांची निगा राखणे इत्यादींसाठी आवश्यक ते मार्गदर्शन व सल्ला उपलब्ध करून दिला जातो, हे यासंदर्भात उल्लेखनीय. या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सोयीसाठी तेथील महिला कर्मचाऱ्यांना अधिक प्रमाण वा संख्येमध्ये घेण्यासाठी नव्या कर्मचाऱ्यांची निवड करताना शैक्षणिक पात्रता व योग्यतेवर आधारित स्वरूपात महिला उमेदवारांना प्राधान्य देण्यावर भर दिला आहे. याशिवाय कंपनीत उपलब्ध असणाऱ्या जागांसाठी पात्रताधारक उमेदवारांचे अर्ज व माहिती कंपनी व्यवस्थापनाकडे पाठविताना त्यात योग्य व पात्रताधारक महिला उमेदवाराची निवड झाल्यास अशा उमेदवाराचा संदर्भ देणाऱ्या कंपनी उमेदवाराला विशेष प्रोत्साहनपर राशी देण्यास सुरुवात केली आहे. कंपन्यांच्या या आणि अशा प्रकारच्या प्रगतिशील धोरणांमुळे या कंपन्यांमधील महिला कर्मचाऱ्यांची संख्या निश्चितपणे वाढत आहे.

सुरुवातीलाच नमूद केलेल्या कंपन्यांपैकी उत्पादन उद्योगातील प्रमुख अशा लार्सन ॲण्ड टुब्रो यासारख्या उत्पादन, प्रकल्प व्यवस्थापन, उद्योग-सेवा व संगणक क्षेत्रातील उद्योगांमध्ये मोठ्या संख्येत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये महिला कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी गेली काही वर्षे ठरवून व योजनापूर्वक प्रयत्न केले आहेत. यासंदर्भात कंपनीच्या अध्यक्षांकडून घोषित करण्यात आलेले धोरणात्मक निर्णय व त्यांच्या अंमलबजावणीचा समावेश आहे. यामध्ये महिला कर्मचाऱ्यांच्या विविध वेळी व विविध प्रकारच्या गरजा लक्षात घेऊन कंपनीने आपली धोरणे आखली आहेत. यामध्ये संबंधित गरजू महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांना विशेष कालावधीसाठी कंपनी व्यवस्थापनातर्फे विशेष सहकार्य दिले जाते. या भूमिकेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत.

लार्सन ॲण्ड टुब्रोसारख्या कंपन्या महिला कर्मचाऱ्यांना तान्ह्या मुलांना घेऊन अशा कर्मचाऱ्यांच्या कामावर ये-जा करण्यासाठी सहानुभूती व विशेष सहकार्याची भूमिका घेतात. यात एक विशेष बाब म्हणून अगदीच तान्ह्या बालकांना ठरावीक काळात सोबत म्हणून त्यांच्या रोजच्या व घरगुती आयांना कंपनी वाहनात संबंधित महिला कर्मचाऱ्यांसह प्रवास करण्याची परवानगी दिली जाते. याशिवाय कंपनीतर्फे विविध ठिकाणी स्थापन केलेल्या महिला कर्मचारी कल्याण केंद्रांच्या माध्यमातून महिला कर्मचाऱ्यांचा सर्वांगीण विकास, त्यांच्या सर्वसाधारण वा विशेष गरजा, वैद्यकीय सल्ला, आर्थिक साक्षरता व गुंतवणूक विषयक सल्ला-मार्गदर्शन इत्यादी सोयी उपलब्ध करून दिल्या जातात.

एलॲण्डटीचे मुख्य मानव संसाधन विकास व्यवस्थापक सी. जयकुमार यांच्या मते, एलॲण्डटी उद्योग समूहाच्या लक्षणीय स्वरूपात असल्याचे त्यांच्या विविध टप्प्यांतील छोट्या-मोठ्या गरजांची पूर्तता करण्याचे प्रयत्न केले जातात व अशा प्रयत्नांचे फायदे महिला कर्मचारी व कंपनी व्यवस्थापन या उभयतांना होतात. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, लार्सन ॲण्ड टुब्रोमधील सुमारे ४३ टक्के महिला कर्मचारी त्यांच्या कामाच्या ठिकाणी व गरजेनुसार कंपनीच्या बालसंगोपनगृहांचा लाभ घेतात. इतर प्रमुख कंपन्यांच्या संदर्भात सांगायचे झाल्यास आर. पी. गोएंका उद्योग समूहांतर्गत महिला कर्मचाऱ्यांसाठी 'शक्ती' या विशेष उपक्रमांतर्गत विविध धोरणात्मक उपाययोजना आखल्या आहेत.

आपल्या याच उपक्रमाचा भाग म्हणून सिएट कंपनीतर्फे त्यांच्या सर्व उत्पादन केंद्रांमधील खास महिला कर्मचाऱ्यांसाठी 'वुमेंटरिंग' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये महिलांच्या परंपरागत स्वरूपातील वैयक्तिक-कौटुंबिक व आरोग्यविषयक गरजांची पूर्तता करताना त्याहीपुढे जाऊन कामाच्या ठिकाणी त्यांचा कौशल्य विकास, नवीन काम शिकणे, विशेष प्रकरणी शंकानिरसन करणे, परस्पर सहकार्याची भावना विकसित करून महिला कर्मचाऱ्यांमध्ये कामाच्या संदर्भात आत्मविश्वासासह काम करण्यास चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. कंपनीच्या या पुढाकारांचा उपयोग महिला कर्मचाऱ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांची क्षमता वाढ, अधिक जबाबदारीसह त्यांना तयार करणे इत्यादीसाठी होत आहे.

यावर्षीच्या प्रारंभी ट्रॅक्टर ते टेक्नोलॉजी या क्षेत्रात अग्रणी स्वरूपात काम करणार्या महिंद्रा उद्योग समूहाने आपल्या विविध कारखाने-कार्यालये इत्यादी ठिकाणी काम करणाऱ्या व वैयक्तिक-घरगुती कारणांनी नोकरीचा राजीनामा दिलेल्या महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या मर्यादित काळासाठी असणारी कौटुंबिक कामे पूर्ण झाली असल्यास पुन्हा कामावर येण्यासाठी आवाहन केले. कंपनीच्या या नव्या उपक्रमाला कंपनीतील माजी महिला कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

भारतीय उद्योगांमध्ये विशेषतः उत्पादन क्षेत्र हे प्रामुख्याने व परंपरागत स्वरूपात पुरुषप्रधान वा पुरुष कर्मचाऱ्यांचे वर्चस्व असणारे मानले जायचे. मात्र, गेल्या दशकात या स्थितीमध्ये मोठे परिवर्तन झालेले दिसते. उत्पादन क्षेत्रात काम करण्यासाठी महिला उमेदवार-कर्मचारी मोठ्या संख्येत पुढाकार घेत असून, त्यांच्या या पुढाकाराला व्यवस्थापनांतर्फे सकारात्मक व उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असल्याचे आशादायी चित्र निर्माण झाले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### महाराजा झाला यमराज


अहमदाबाद शहरात १२ जूनला एअर इंडियाच्या बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमानाचा भयंकर अपघात झाला. या अपघातात शेकडो निरपराध नागरिकांचा अतिशय करुण अंत झाला. एअर इंडियाची ओळख असलेल्या महाराजाचा जन्म १९४६ साली झाला. महाराजाची कल्पना एअर इंडियाचे तत्कालीन व्यावसायिक संचालक सोराब कैखूसरू कूका यांच्या सुपीक डोक्यातील होती.

एअर इंडिया ही विमान कंपनी १९३२ साली अस्तित्वात आली. १९५३ ते २०२२ पर्यंत कंपनीची मालकी भारत सरकारकडे होती. तोट्यात चालणारी ही विमान कंपनी खाजगी कंपनीला विकण्याचा प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू होता. अखेर २०२२ साली केंद्र सरकारने टाटा समूहाला एअर इंडिया विकली. आज एअर इंडियाची ४४ आंतरराष्ट्रीय आणि ४४ देशांतर्गत उड्डाणे कार्यरत आहेत. आता टाटा समूहातर्फे संचालित ही कंपनी नफ्यात येऊ लागली होती. वॉशिंग्टन-दिल्ली या विमान प्रवासात अनेकदा एअर कंडिशनिंग बंद होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. जवळपास पंधरा तास विमान प्रवासी किती आणि कसा त्रास सहन करत असतील याची कल्पना केली तरी जीव घाबरतो. ज्या एअर इंडियाच्या विमानाचा अपघात झाला त्यात काही तांत्रिक त्रुटी असल्याबाबत तक्रार करण्यात आली होती. अपघाताचे नेमके कारण काही दिवसांत समोर येईल. पण त्या ड्रीमलायनर विमानातून प्रवास करणाऱ्यांचे 'ड्रीम्स' आता कधीही पूर्ण होणार नाहीत. एअर इंडियाच्या प्रसन्न महाराजाचे रूपांतर क्रूर यमराजात झाले हे मात्र भीषण वास्तव आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

### इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो

दरवर्षी १ जुलै हा दिवस संपूर्ण राज्यात कृषी दिन म्हणून साजरा केला जातो. मात्र आज शेतीची आणि शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटांनी बळीराजा पिचला आहे. शेतकरी हा शब्द बोलायला जेवढा सोपा आहे तेवढा सोपा नाही. शेती करताना अचानक येणाऱ्या संकटांचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. त्यात बेमोसमी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ, गारपीट, बाजारपेठेतील बाजारभावात होणारी घसरण, शेतीसाठी सावकाराकडून किंवा बँक, पतसंस्था इत्यादींकडून घेतलेले कर्ज परतफेडीची मुदत, निर्यातीत होणारे शासकीय बदल या व अशा सर्व संकटांना शेतकरी सामोरे जात असतो. हवामानात अचानक होणाऱ्या बदलांमुळे शेतीतील पिकांचे नुकसान होते. हजारो-लाखो रुपये खर्च करून शेतकरी आपला शेतीमाल तयार करतो. त्याची काळजी घेतो. पण त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळतेच असे नाही. कधी अस्मानी तर कधी सुलतानी संकटांनी बळीराजाचा हातचा घास हिरावला जातो. शासन दरबारीही त्याची दखल घेतली जात नाही. कर्जाच्या बोझ्याखाली अडकून बळीराजा आत्महत्या करतो. महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात सर्वाधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. शेतकऱ्यांना कोणी वाली नाही अशी भावना शेतकऱ्यांची झाली आहे. हे चित्र बदलायला हवे. पुन्हा एकदा इडा पिडा टळो आणि बळीचे राज्य येवो हा आवाज घराघरातून घुमायला हवा यासाठी आजच्या कृषिदिनापासून प्रयत्न करायला हवेत.



**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### हिंदीची सक्ती की मराठीची सक्ती?

महाराष्ट्राची ग्रामीण अर्थव्यवस्थाच मोडकळीस आली आहे हे वास्तव आहे. कारण अमराठी बिल्डरसुद्धा कंत्राटदारांच्या ताब्यात आहेत आणि तशी ती व्यवस्था सर्व राजकीय पक्षांनीच केलेली आहे. त्रिभाषेचा प्रश्न मिटविला सुद्धा जाईल पण खरा प्रश्न सुटणार आहे का? राजकीय अवसर कॅश करण्याची यंत्रणा आणि जनाधारसुद्धा नसल्यामुळे कोणत्या भाषेची नक्की सक्ती असेल किंवा होणार हे न उलगडणारे कोडे आहे; तोपर्यंत राजकीय सर्कस बघण्याशिवाय पर्याय नाही. दुसरा भाग असा आहे काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा सातवीपर्यंतच शिकविली जाते व मराठी भाषेला तिसऱ्या भाषेचा दर्जा दिला जातो. अशावेळी महाराष्ट्र प्रेमाची व मराठी भाषाभिमानाची मोठमोठी भाषणे करणाऱ्या नेत्यांनी कधीच त्यांचा जाहीर आक्षेप का घेतला नाही? जर अशा शाळा ब्रिटिश पद्धतीने वागत असतील तर महाराष्ट्राची मुले मराठी भाषेला घाबरूनच राहणार. याचाच अर्थ २०२० चा महाराष्ट्र शासनाचा निर्णय व कायदा यांची पायमल्लीच नाही का? कोणतीही शाळा असली तरी महाराष्ट्राच्या संस्कृतीशी जुळणारी असली पाहिजे. हा गोंधळ आणि मोर्चा,आंदोलन होऊ नये यासाठीच त्रिभाषा धोरणाचे दोन्हीही जीआर रद्द करून महाराष्ट्र राज्य सरकारने उत्तम निर्णय घेतलेला आहे आणि नवीन समितीनुसार निर्णय होईल हे सुद्धा सांगून आपली बाजू भक्कम केलेली दिसते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा- गुप्ता

## कमला नगर येथे ५ स्टार हिंगोलीकर कार्यक्रमाचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

सध्या पर्यावरणाचा समतोल बिघडला असून याचे दुष्परिणाम मानवाला भोगावे लागत आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावून इतर पर्यावरणपूरक बाबी करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

हिंगोली नगर परिषदेच्यावतीने ५ स्टार हिंगोलीकर अभियान राबवण्यात येत आहे. स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा, ५ स्टार हिंगोलीकर अभियान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंढे, माजी नगराध्यक्ष अनिता सुर्यतळ, उपमुख्याधिकारी शाम माळवटकर, प्रकाश साबळे, सचिन पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले की, नागरिकांनी सोलर पॅनल लावून वीजेची बचत करावी. बिलात मिळणारी सवलत घ्यावी. घरासमोर अथवा परिसरात जास्तीत जास्त झाडे लावावीत, जलपुर्नभरण करून पाण्याचा साठा वाढवावा तसेच कचऱ्याचे घराचत विलगीकरण करावे, नगर परिषदेचा कर नियमितपणे भरावा आदी बाबींचा ५ स्टार हिंगोलीकर या अभियानात समावेश आहे.

यावेळी मुख्याधिकारी अरिवंद मुंढे यांनी ५ स्टार हिंगोलीकर या अभिनव उपक्रमाची माहीती दिली. या अभियानात २०० पात्र मालमत्ता धारकांना ५ हजार रूपये बक्षीस व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक घर व आस्थापनेचा सर्वे करण्यात येणार आहे. तसेच समितीमार्फत मुल्यांकन करण्यात येणार आहे. या अभियानात सहभागी होणाऱ्यांना दि ३१ ऑगस्टपर्यंत हिंगोली नगर परिषद कार्यालयात अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये नगर परिषद क्षेत्रातील सर्व घरे, व्यावसायिक व सर्व शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये यांनी जलपूर्नभरण, घराभोवती किमान ५ झाडे लावणे, कचऱ्याचे स्त्रोतावरच वर्गीकरण, रूफटॉप सोलर पॅनल, नगर परिशदेच्या करांचा नियमित व वेळेत भरणा हे पाच निकष लावण्यात आले आहेत.

यावेळी कमला नगर भागातील महिलांना या ५ स्टार हिंगोलीकर उपक्रमानिमित्त कार्यक्रम घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी गुप्ता आणि मुख्याधिकारी मुंढे यांनी कौतुक केले. यावेळी नगर रचनाकार प्रदीप मोहकर, नगर अभियंता प्रतीक नाईक, लेखापाल अनिकेत नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, अभियंता स्नेहल आवटे, रामेश्वर चाटे, गोविंद चव्हाण, श्याम कदम, संजय दोडल, विनय साहू, संदीप घुगे, एजाज पठाण, कैलाश थिटे, राजेश डहाळे, नितीन पहीनकर, संघपाल नरवाडे, कमलेश इंगळे, पंडीत मस्के, प्रवीण चव्हाण, नागेश नरवाडे, देवीसिंह ठाकूर, विजय रामेश्वरे, दिनेश वर्मा, संदीप गायकवाड, दिनकर शिंदे, यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सीताराम जोंधळे यांनी केले.

# पोलिस दलातील नऊ पोलिसांचा सेवानिवृत्ती सोहळ्यात सत्कार

## स्थानिक गुन्हे शाखेचे विकास पाटील यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

जिल्हा पोलिस दलातील नऊ पोलिस कर्मचारी सेवानिवृत्त झाल्याने सोमवारी त्यांच्या सेवानिवृत्तीबद्दल जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधिक्षक अर्चना पाटील, प्रभारी गृह पोलिस उपाधिक्षक प्रेमकुमार मोकाशे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांनी त्यांचा सत्कार केला.

हिंगोली जिल्हा पोलिस दलातील नियंत्रण कक्षातील पोलिस उपनिरीक्षक आनंदराव पुंजाजी मस्के, पोलिस मुख्यालयातील पोलिस उपनिरीक्षक उत्तम परशुराम घोडाम, कळमनुरी ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक शेषराव राजाराम पिंपरे, नर्सी नामदेव ठाण्यातील सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक गोविंद व्यंकटराव गुडे, पोलिस मुख्यालयातील सपोउपनि किशन फरीदा गेडाम, बिनतारी संदेश विभागातील पोलिस उपनिरीक्षक बियंचा रामा गणपत कच्छवे, वसमत शहर ठाण्यातील तेजेराव जळबाजी सोनकांबळे व बासंबा ठाण्यातील विष्णू लक्ष्मण राठोड हे नऊ पोलिस कर्मचारी ३० जून रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या निरोप समारंभ सोहळ्याचे आयोजन जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात करण्यात आले. यावेळी पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधिक्षक अर्चना पाटील, प्रभारी गृह पोलिस उपाधिक्षक प्रेमकुमार मोकाशे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांनी सेवानिवृत्त पोलिस कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. यावेळी सेवानिवृत्त पोलिस कर्मचाऱ्यांनी आपल्या कारकीर्दीमधील

काही आठवणींना उजाळा दिल्याने काहीवेळ वातावरण भावुक झाले होते. पोलिस उपनिरीक्षक आनंद मस्के यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला असता त्यांच्या कुटूंबीयातील आई गंगाबाई मस्के, पत्नी सौ. नंदिनी मस्के, अँड. अक्षय मस्के, आयटी व्यवसायीक अभिजीत मस्के, सुन मधुरा मस्के, राजू पोले, नातू विराज मस्के, सात्विक मस्के आदींची उपस्थिती होती.

# गंगा नगर भागात निकृष्ट रस्त्यांच्या कामाची चौकशी करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत हिंगोली तालुक्यामध्ये ठेकेदारा द्वारे झचत्रद्ध्ध व ईतर योजने अंतर्गत सीसी रोड चे व ईतर काम हिंगोली तालुक्यात विविध ठिकाणी केले जात आहेत. गंगा नगर भागात सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून पंधरा दिवसातच सिमेंट रस्ते उखडले आहेत. त्यामुळे येथील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या कामांची चौकशी करण्याची मागणी विराट राष्ट्रीय लोकमंचचे संस्थापक अध्यक्ष शेख नईम शेख लाल अयांनी जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता यांचेकडे केली आहे. शहरानजीक असलेल्या ग्रामपंचायत अंतर्गत गंगा नगर भागात सिमेंटच्या रस्त्यांची कामे सुरू आहेत. सदरील कामे इंजिनिअर गीते यांच्या देखरेखील केल्या गेली आहेत. जुनेच रस्ते जेसीबीने उखडून तीच माती पुन्हा रस्त्यावर टाकून दबाई केली. त्यानंतर अवघ्या काही तासातच सिमेंट रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आली आहेत. सिमेंट वाळू आणि गिट्टीचे प्रमाणही कमी अधिक प्रमाणात घेतल्यामुळे हे रस्ते पंधरा दिवसातच उखडले असून पावसामुळे या रस्त्यावर आता पाणी साचत असून नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागतआहे तसेच ठेकेदारा मार्फत केले जाणारे काम अंदाजपत्रका नुसार केले जात नसून सदर कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागा द्वारे गंगा नगर येथे नागेश बोलके यांचे घर ते बोडूलवार/भालेराव यांचे घरा पर्यन्तचे सिमेंट रोड काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले जात आहे सदर काम सुरु करताना जुने रोडचे खोदकाम न करता त्याच रोडवर बेड टाकून कामास सुरुवात केली ज्या मुळे सदर रोड किती काळ टिकणार या सभ्रम निर्माण होत आहे. या कामाचे याचे गजख टॅग फोटो आपल्या आवलोकणास्तव सादर करीत आहे. हिंगोली तालुक्यातील पीएमजीएसवाय योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामाची चौकशी करून जवाबदार ठेकेदार गंगा नगर भागातील कामाची चौकशी करून दोषी ठेकेदारावर कारवाई करून गंगा भागातील नागरिकांना न्याय द्यावा.

# सहकारी बँकेतील गैरव्यवहार प्रकरणी समिती नेमावी- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

जिल्ह्यातील आर्थिक गैरव्यवहार झालेल्या सहकारी बँका, पतसंस्थामधील ठेवीदारांच्या आर्थिक गैरव्यवहाराची विशेष तपासणी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमावी. या समितीमार्फत आर्थिक गैरव्यवहार झालेल्या सहकारी बँकाची, पतसंस्थांचे रेकॉर्ड तपासून त्याचा वस्तुनिष्ठ अहवाल तात्काळ सादर करण्यासाठी समितीला वेळ ठरवून द्यावी. समितीकडून प्राप्त अहवालानुसार संबंधित बँका, पतसंस्थावर योग्य ती कार्यवाही करुन ठेवीदारांच्या रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आयोजित बैठकीत दिले.

ठेवीदाराच्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत आढावा घेण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील सर्व सहकारी बँका, ठेवीदार यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक सुरेखा फुपाटे, जिल्ह्यातील सर्व सहायक निबंधक उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे व इतर सर्व प्रकारच्या भूसंपादनाच्या प्रलंबित असलेल्या मावेजाचे १५ जुलै पर्यंत वाटप करुन त्याचा अहवाल सादर करावा. मावेजा वाटपाची माहिति भूमिराशी पवर अपलोड करावी. तसेच न्यायालयीन प्रकरणाची माहिति मॅनेज माय ला सूट पवर तात्काळ भरावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बैठकीत दिले. भूसंपादन प्रकल्पाची सद्यस्थिती व मोबदला वाटप रकमेबाबत आढावा घेण्यासाठी आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली व्हीसीद्वारे ऑनलाईन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालयातून भूसंपादन विभागाच्या उपजिल्हाधिकारी मंजुषा मुथा या उपस्थित होत्या. तर सर्व उपविभागीय अधिकारी, राष्ट्रीय महामार्गाचे व रेल्वे प्राधिकरणाचे अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

जिल्ह्यातील काही ग्रामीण भागात नेटवर्क नाही. त्या ठिकाणी टॉवर बसविण्याची कार्यवाही करावी. यासाठी लागणाऱ्या आवश्यक त्या परवानगीसाठी काही अडचण येत असल्यास लेखी कळवावे. असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हास्तरीय दूरसंचार समितीच्या आढावा बैठकीत दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी टॉवर उभारणी, ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी आपणास लागणाऱ्या सर्व परवानग्यासाठी येत असलेल्या अडचणीबाबत लेखी पत्राद्वारे आयटी विभागाला कळवावे. लवकरच बैठकीचे आयोजन करुन आपणास आवश्यक असणाऱ्या परवानग्या देता येईल. यासाठी संबंधित विभागाचे अधिकारी, व्यापारी महासंघाचे पदाधिकारी यांना बोलवावेत, अशा सूचना दिल्या.

यावेळी आयटी विभागाचे जिल्हा व्यवस्थापक उमाकांत मोकरे, एअरटेल, जीओ, बीएसएनल, व्होडाफोन यासह विविध कंपन्याचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्ह्यातील शाळांमध्ये शिबीरे घेऊन बालकांची आधार नोंदणी पूर्ण करावी. सर्व बालंकाचे बँक खाते आधार संलग्न करुन घ्यावेत. अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हास्तरीय आधार नियंत्रण समितीच्या बैठकीत दिले. या बैठकीस महिला व बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधीक्षक यांचे प्रतिनिधी, शिक्षणाधिकारी, बँकाचे प्रतिनिधी यांच्यासह महाआयटीचे जिल्हा व्यवस्थापक उमाकांत मोकरे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### रास्ते की पाठशाला पुस्तकाचे विमोचन



हिंगोली- उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे तयार करण्यात आलेल्या 'रास्ते की पाठशाला' पुस्तकाचे विमोचन आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकामध्ये रस्ते वाहतूक चिन्हे, सायकलींग सुविधा, स्कूल बस सुरक्षा, पादचाऱ्यांसाठी सुरक्षा नियम, आपत्कालीन परिस्थती, हेल्मेट, सीटबेल्ट, सेफ्टीबेल्ट वापराबाबतची माहिती देण्यात आली आहे. यावेळी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, मोटार वाहन निरीक्षक अरविंद तोडकरी आदी उपस्थित होते.

### औंढा पंचायत समितीत कृषी दिन साजरा



हिंगोली- औंढा नागनाथ येथील पंचायत समितीमध्ये हरित क्रांतीचे प्रणेते तथा मा.मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. प्रारंभी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास गटविकास अधिकारी गोपाळ कल्हारे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी सुभाष पाचपुते, तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संघेकर, मंडळ कृषी अधिकारी विजय संघई, किशोर शेळके, उपस्थित होते. कार्यक्रमात शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विस्तार अधिकारी सय्यद जमीर, विस्तार अधिकारी एस एम आमले, राधेश्याम परांडकर संतोष काळे मनोहर तुमराम अक्षय बगाटे नितीन हजारे, राजेश पवार, करण पवार, गोविंद भोजे, संगीता कीर्तने, संजय घोंगडे, मोहन माने, प्रणीता वैद्य, जी. एन. गच्चे, अभिजित गायकवाड, रमेश पवार, अंबादास कुहीरे, शिवशंकर राऊत, नागनाथ भोजे आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषी सहाय्यक, कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. प्रस्तावना व सूत्रसंचालन सुभाष पाचपुते तर आभार राधेश्याम परांडकर यांनी मानले.

### ९६ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- जिल्ह्यात ९६ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही करीत त्यांचेकडून ७८७५० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.

# जिल्हा निर्देशांक आराखडा प्रगतीमापन अहवाल पुस्तकाचे विमोचन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

जिल्हा सांख्यिकी कार्यालयामार्फत सन २०१५-१६ ते २०२२-२३ या वर्षांकरिता शाश्वत विकास ध्येय्यांच्या अनुषंगाने जिल्ह्यांतर्गत सर्व घटकनिहाय सांख्यिकी माहिती असलेले प्रकाशन तयार करण्यात आले आहे. या पुस्तकाचे विमोचन आज सोमवारी (दि.३०) रोजी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रगतीमापन अहवालामध्ये जिल्ह्याच्या सन २०१५-१६ ते २०२२-२३ या संदर्भीय वर्षांकरिता शाश्वत विकास ध्येय्यांच्या अनुषंगाने एकूण १२० निर्देशकांचा समावेश करण्यात आला आहे. हे एकूण १२० निर्देशांक १७ विकास ध्येयांची पुर्तता करतात. या अहवालामध्ये मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, प्राथमिक शिक्षण परिषद, राष्ट्रीय कौटूंबिक आरोग्य सर्वेक्षण ४ व ५ तसेच जिल्हा व राज्यातील सर्व संबंधित यंत्रणांकडून सांख्यिकी व इतर माहिती संकलीत करण्यात आलेली आहे. शाश्वत विकास ध्येये हे प्रकाशन हिंगोली जिल्ह्याची जिल्हा वार्षिक योजना तयार करण्यासाठी तसेच विविध विभागांना त्यांच्या विकास योजनांचे सनियंत्रण करण्यासाठी पथदर्शी ठरेल, असा विश्वास जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी व्यक्त केला आहे. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक एस. एम. रचावाड, सहाय्यक संशोधन अधिकारी ए. ए. करेवार, सांख्यिकी सहाय्यक अ. दा. वाडोकार उपस्थित होते.

# आदर्श महाविद्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती दि १ जूलै २०२५ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख उपस्थित महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. संजय नरवडे, एमसीव्हीसी समन्वयक डॉ संजय कयाल, स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर, प्रो. डॉ. बाळासाहेब साळवे, प्रा. डॉ. आनंद भट्ट, प्रा. डॉ. राजाराम पिंपळपल्ले, प्रा. डॉ. विलास पवार, प्रा. डॉ. सुयोग दोडल, प्रा. डॉ. सोपान खरात, प्रा. डॉ. सुभाष पोले, मेजर पंढरीनाथ घुगे, प्रा. डी एस पवार, प्रा. डॉ. महेश मंगनाळे, प्रा. तुकाराम आडे, प्रा. डॉ. सुरेश लेकुळे, प्रा. लक्ष्मण सोळंके, कैलास डिडाळे, प्रवीण दुबे, मिलिंद रांजणिकर, बालाजी घुगे, प्रा. पंडित कुराडे, विजय पाठक, मनीष दायमा, गोविंद पारिख, सोहेल खान पठाण, तालिब पठाण, इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

# मासेमारी करणाऱ्यांना अर्थसहाय्य सहकारी योजनेचा लाभ देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

जिल्ह्यातील भोई समाजातील मच्छीमारी करणाऱ्या लोकांना सहकारी योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी मच्छीमारांच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेमार्फत मत्स व्यवसाय विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

भोई समाजातील अनेक बांधव जिल्ह्यात मच्छीमारीचा व्यवसाय करीत आहेत. त्यांना सहकारी योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यामुळे मच्छीमारांना सहकारी योजनेतून अर्थसहाय मिळावे तसेच जाळे, किसान कार्ड, घरकुल योजना, थर्माकॉल नाव, फेक जाळे तसेच विम्याचा लाभही मिळावा असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. निवेदनावर आनंदा शिरफुले, बाळू शिरफुले आंबादास शिरफुले, संतोष शिरफुले यांच्यासह मच्छीमारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## शंभर अमरनाथ यात्रेकरूंना शहर शिवसेनेतर्फे निरोप

# यात्रा म्हणजे मनाची शुद्धी संयम व ईश्वराशी आत्मिक संबंधाचा अनुभव -अभिमन्यू खोतकर



६ तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अत्यंत कठीण आणि पवित्र समजली जाणारी अमरनाथ यात्रा करण्यासाठी शंभर भाविकांचा जत्था आज मंगळवार, दि. १ जुलै रोजी जालना येथून रवाना झाला. या भाविकांना रेल्वे स्थानकावर शहर शिवसेना आणि युवा सेनेच्यावतीने निरोप देण्यात आला.

युवा सेनेचे राज्य सचिव अभिमन्यू खोतकर आणि शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांच्या हस्ते भगवी शाल, पुष्पहार देऊन यात्रेकरूंचा सत्कार करण्यात आला. यावेळी अभिमन्यू खोतकर म्हणाले की, अमरनाथ यात्रा ही केवळ एक शारीरिक यात्रा नसून ती एक अध्यात्मिक यात्रा आहे. बर्फातून प्रकट होणाऱ्या स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन हे जीवनात एकदा तरी अनुभवावे, असे आहे. या यात्रेच्या माध्यमातून मनाची शुद्धी, संयम आणि ईश्वराशी आत्मिक संबंध यांचा अनुभव येतो, असे ते म्हणाले. यावेळी मेघराज चौधरी, दिनकर घेवंदे, मंगल घारे, राजू माध-ववाले, गोपाल चौधरी, शुभम टेकाळे, कुणाल जाधव, आयुष राठोड, राम खांडेभराड, पांडुरंग खैरे, लखन ठाकूर, संतोष माधववाले, मनोज घारे, विष्णू बेनिवाल, नितेश बेनिवाल यांच्यासह शिवसेना, युवासेना आणि शहरातील श्रद्धावान नागरिक उपस्थित होते. यात्रेकरूंना सुरक्षित, आनंददायी आणि स्मरणीय यात्रा व्हावी, यासाठी सर्वांनी सदिच्छा दिल्या.

### श्रद्धा, समर्पण आणि आत्मिक उन्नतीचा प्रवास -विष्णू पाचफुले

याप्रसंगी संयोजक विष्णू पाचफुले यात्रेचे महत्त्व विशद करताना म्हणाले की, अमरनाथ यात्रा म्हणजे भक्ती, श्रद्धा आणि धैर्याचा संगम आहे. ही यात्रा केवळ एका स्थळाचा प्रवास नसून, ती आत्म्याच्या गाभ्याशी जोडणारा एक अध्यात्मिक अनुभव आहे. हिमालयाच्या कठीण आणि थरारक मार्गांवरून चालताना यात्रेकरूंच्या मनात एक अनामिक आत्मबल आणि ईश्वरावर अढळ विश्वास निर्माण होतो. या यात्रेमुळे मनाचा कस लागतो, अहंकार झटकला जातो आणि अंतर्मन शांत, शुद्ध होतं. हिमालयातल्या निसर्गसौंदर्याबरोबरच बर्फातून प्रकट होणाऱ्या पवित्र शिवलिंगाचं दर्शन ही जीवनातील अत्युच्च आध्यात्मिक अनुभूती आहे.अशा पवित्र यात्रेला निघालेल्या प्रत्येक भाविकाच्या पावलांमध्ये शिवभक्तीचे तेज असते. त्यांना शुभाशीर्वाद देणे, त्यांच्या सेवेसाठी काही करता येणे, हे आमच्यासाठी केवळ जबाबदारी नसून खरे तर परम सौभाग्य आहे, अशा भावना व्यक्त करत त्यांनी यात्रेकरूंना शुभेच्छा दिल्या.

## संक्षिप्त

### आ.डॉ.हिकमत उढाण यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील शहागड सर्कलमधील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले अंबड तालुका शिवसेनेच्या वतीने शहागड सर्कलमधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेश नगर येथे विध्यार्थ्यांना वही-पेन वाटप करण्यात आल्या. त्यावेळी प्रमुख उपस्थिती मा श्री बंटी भैय्या आटोळे शिव-सेना उपतालुकाप्रमुख. मा श्री राम राजेंद्र काळे युवा सेना तालुकाप्रमुख. शोएब सय्यद.मा श्री दत्ता भाऊ गुळजकर.कचरु खराद रहीम बागवान मा श्री दीपक गव्हाणे बळी थोटे आकाश पवार विकी पांचाळ, शाळेतील अध्यक्ष-उपाध्यक्ष, गावातील तरुण मित्र व शाळेतील सर्व मुख्यध्यापक-शिक्षक उपस्थित होते.

### परतूरला शास्त्री विद्यालयात विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत शहरातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात मंगळवारी (दि.१) विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.यावेळी मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक तारे यांनी सांगितले की,शालेय शिक्षण व आरोग्य विभागाच्या वतीने शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे तसेच विद्यार्थ्यांना काही आजार असल्यास त्याचे निदान व्हावे, आजारावर वेळीच उपचार व्हावेत या उद्देशाने राष्ट्रीय स्वास्थ्य कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत ही आरोग्य तपासणी करण्यात आली. डॉ.पायल माने, डॉ. अनुजा पवार, डॉ. विजय बकान यांनी ही तपासणी केली. याप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक राजकुमार राऊत,त्र्यंबक घुगे, रवींद्र आकणीकर, बळीराम राठोड, दत्तात्रय आकात,वैजनाथ तनपुरे,मधुकर वखरे, रामराव पवार, अरुणकुमार वावरे,बालासाहेब लाटे, प्रभाकर मस्के, संजय कदम,पंडित निर्वळ,दिनकर सालगावकर, संदीप वाघमारे, शिवाजी आळणे,श्रीमती लड्डा मॅडम, अवसरमोल मॅडम यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षिका, व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्व.वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.



जालना येथील प्रति पंढरपूर समजली जाणारे आनंदी स्वामीची आजपासून यात्रा महोत्सव ला सुरुवात झाली असून पहिल्या दिवशीचे रूप आनंदी स्वामींचे दिसून येत आहे (छायाचित्र किरण खानापुरे)

## तहसील कार्यालयात अस्वच्छतेचा साम्राज्य; नागरिकांमध्ये तीव्र नाराजी

तभा वृत्तसेवा
बदनापूर/प्रतिनिधी

बदनापूर तहसील कार्यालयाच्या परिसरात वाढती अस्वच्छता आणि अधिकाऱ्यांचे ठोस दुर्लक्ष नागरिकांच्या तक्रारीचा विषय बनले आहे. कार्यालयाच्या भिंती गुटख्याच्या लाल फेकांनी रंगलेल्या असून, परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे




तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना भिंतीवरील थुंकीचे डाग आणि परिसरातील गलिच्छता याचा सतत सामना करावा लागत आहे. विविध खात्यांमध्ये जाण्यासाठी नागरिक ज्या मार्गाने जातात, तिथे तंबाखू, गुटखा सेवन करणाऱ्यांनी खुलेआम फिचकाऱ्या मारल्याने भिंतींचे विद्रूप रूप झाले आहे.

या प्रकाराकडे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची नागरिकांची तक्रार असून, प्रशासनाच्या नजरेआड हे दृश्य जातं कसं? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक विचारू लागले आहेत. तहसील कार्यालय हे तालुक्याचे मुख्य प्रशासकीय केंद्र असताना येथे अस्वच्छतेचे असे दृश्य अप्रामाणिकपणा आणि निष्काळजीपणाचे द्योतक मानले जात आहे.दैनंदिन ये-जा करणाऱ्या नागरिकांची गर्दी असलेल्या ठिकाणी अस्वच्छतेचे हे चित्र प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नागरिक अनिल देशमुख यांनी दिली.

> “ नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे की, या प्रकाराची गंभीर दखल घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरून तात्काळ कारवाई केली जावी, तसेच परिसरात स्वच्छतेसाठी नियमित पावले उचलण्यात यावीत. - **रमेश चोरमारे शिवसेना शहर उपप्रमुख बदनापूर**

## वृक्षारोपण करून वसंतराव नाईक यांची जयंती साजरी

### कृषी महाविद्यालयातील विद्यार्थिनींचा उपक्रम



तभा वृत्तसेवा
बदनापूर/प्रतिनिधी

हरित क्रांतीचे शिल्पकार आणि माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी महाविद्यालय, बदनापूर यांच्या वतीने अकोला (नि.) येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या उपक्रमात प्राचार्य डॉ. दीपक पाटील, डॉ. नितीन देशमुख, डॉ. अस्मिता सुरडकर व डॉ. राहुल कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी पुढाकार घेतला.


कार्यक्रमाला अकोला गावचे सरपंच महादू गिते, उपसरपंच दत्ता तांबे, तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

‘ग्रामीण जागरूकता व कार्यानुभव’ उपक्रमांतर्गत झालेल्या या वृक्षारोपणात कु. शितल खैरे, ऋतुजा वानखेडे, भाग्यशाली जाधव, गायत्री खरात, निकिता काळे, क्रिती अरोरा, स्वराली जाधव, निता भांदुर्गे, प्रतिक्षा वारंगुळे, मनिषा राणी व पूजा शर्मा या विद्यार्थिनींनी मोल-ाचे योगदान दिले. स्थानिक नागरिकांच्या सहभागाने उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद लाभला असून विद्यार्थिनींच्या या सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## राजर्षी शाहु महाराजाकडुन सामाजिक न्यायाची पायाभरणी

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

कोल्हापुर संस्थानचे अधिपती राजर्षी शाहु महाराज यांनी आपल्या कारकिर्दीत सामाजिक क्रांतीचे अनेक निर्णय घेतले ज्या निर्णयामुळे देशात सामाजिक न्यायाची पायाभरणी होवून डाँ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यास घटनेच्या माध्यमातून मुर्त स्वरूप दिल्याचे प्रतिपादन प्रा.प्रल्हाद लुलेकर यांनी ताडहादगाव येथे दि.२८ रोजी आयोजित छत्रपती शाहु महाराज जयंती प्रसंगी केले.ताडहादगाव येथे छत्रपती शाहु महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी



जयंती निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर दिवटे,माजी सभापती बप्पासाहेब गोल्डे,संभाजी उबाळे,सतिष खरात,सुशीलकुमार रुपवते,रामसेठ लांडे,नंदु पुंड,शिवाजी गाडेकर,बापुराव हरिश्चंद्रे,बन्सीभाऊ शेळके,परमेश्वर वाघुंडे, सरपंच शारदा वाघमारे, मुख्याध्यापक शेरे सर,सतिष नाझरकर,जयाजी हरिश्चंद्रे,अशोक गिरी आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.इतिहास संशोधक रामभाऊ लांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.पुढे बोलतांना प्रा.लुलेकर म्हणाले की राजर्षी शाहु महाराज यांनी संस्थानातील भेदभाव संपवण्यासाठी गंगाराम कांबळे यांस हाँटेल सुरु करण्यासाठी प्रोत्साहन दिले तसेच त्याच्या हाँटेलमध्ये जावून चहा घेतला.आरक्षणाची संकल्पना मांडली कोल्हापूर संस्थानातील लोकांना नोकरीत आरक्षण बहाल केले,भेदभाव करणाऱ्या लोकांना शिक्षा दिली.यावेळी जिल्हा परिषद शाळा व मत्स्योदरी विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ उपस्थित होते.शेवटी कार्यक्रमाचे संयोजक सुभाष ससाणे यांनी सुत्रसंचालन करुन आभार मानले.

## ज्योतिषकार सुनील महाराज दडके ज्योतिषभूषण पुरस्काराने सन्मानित

तभा वृत्तसेवा
मंठा/ प्रतिनिधी

वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठान महाजन पंचांग नाशिक यांच्या वतीने ज्योतिषकार सुनील महाराज दडके यांचा ज्योतिषभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. नुकत्याच नाशिक पंचवटी येथे आयोजित राज्यस्तरीय ज्योतिष परिषदेत पंचांगकर्ते मोहन शास्त्री दाते यांच्या हस्ते त्यांनी पुरस्कार स्वीकारला. प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

मंठा तालुक्यातील केदारवाकडी येथील ज्योतिषकार सुनील महाराज दडके हे मागील चार वर्षापासून नाशिक येथील




पंचांगकर्ते ज्योतिषशास्त्री हर्षद महाजन यांच्याकडे ज्योतिष शास्त्राचा अभ्यास करतात. फल ज्योतिष शास्त्रातील उच्चस्तरीय अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. श्री दडके यांनी यापूर्वी ज्योतिष प्रबोध, ज्योतिष विशारद आणि ज्योतिष प्रवीण या पदव्या प्राप्त केल्या आहेत. सध्या त्यांचा ज्योतिर्विद्या आणि वाचस्पती हा अभ्यासक्रम सुरू आहे. या ज्योतिष परिषदेला महाराष्ट्रातील ज्योतिष प्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सुनील महाराज दडके यांना ज्योतिष भूषण हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## मौजे सोमनाथ येथील सुरेश एखंडे यांचा दानवेंच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

मौजे सोमनाथ (ज.) ता.जालना येथील श्री.सुरेश एखंडे यांनी आज भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. माजी केंद्रीय मंत्री तथा भाजपा नेते रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रेरणादायी नेतृत्वावर आणि भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या संघटन कौशल्यावर विश्वास ठेवून त्यांनी हा निर्णय घेतला.

भाजपाचे जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी श्री.सुरेश एखंडे यांचे औपचारिक स्वागत केले. यावेळी पवार यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, भाजपाचे नेतृत्व विकासाभिमुख असून देशहित व लोकहितासाठी झटणारा पक्ष आहे. आपल्या भागाच्या प्रगतीसाठी भाजपात राहून कार्य करणे हीच खरी गरज आहे. यावेळी तालुका अध्यक्ष संजय डोंगरे, एसी मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिल सरकटे, सरचिटणीस सुनील पवार, सुहास मुंडे, युवा मोर्चा अध्यक्ष कृष्णा गायके, गणेश खरात, नागेश अंभोरे, विकास कदम, देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, राजेश जोशो, सिद्धिविनायक मुळे, राजाराम जाधव, शिवाजी गवारे, दौलत भुतेकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

## खुनाच्या आरोपींना दोन तासांत अटक -परतूर पोलिसांची कारवाई

तभा वृत्तसेवा
परतुर/प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील वाढोणा शिवारात घडलेल्या खून प्रकरणातील दोन्ही आरोपींना अवघ्या दोन तासांत अटक करण्यात परतूर पोलिसांना यश आले आहे. पोलिसांच्या या जलद कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

२९ जून २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास वाढोणा शिव-रातील गट क्रमांक ११९ मधील शेतात ही धक्कादायक घटना घडली. तक्रारदार गणेश तुळशीदास तनपुरे (वय ६०) आणि त्याचा मुलगा किरण तनपुरे (वय २४) शेतात काम करत असताना, चुलत भाऊ परमेश्वर गुलाबराव तनपुरे आणि त्याचा मुलगा किशोर परमेश्वर तनपुरे यांनी शेतातील सामायिक बांधावरून पावसाचे पाणी जाण्यासाठी तक्रारदाराच्या बाजूने चारी खोदली. यावरून दोन्ही कुटुंबांमध्ये वाद निर्माण झाला.

वादाचे रुपांतर हिंसाचारात झाले आणि आरोपींनी तक्रारदार गणेश तनपुरे यांना मारहाण केली. त्याचा मुलगा किरण तनपुरे मध्यस्थी करत असताना, आरोपींनी रागाच्या भरात बाधावरील दगडाने त्याच्या डोक्यावर व चेहऱ्यावर जोरात मारहाण केली. या मारह-ाणीमध्ये किरण तनपुरे याचा जागीच मृत्यू झाला. आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते.



या घटनेच्या अनुषंगाने परतूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून परतूर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अवघ्या दोन तासांत दोन्ही आरोपींना अटक केली. अटकेनंतर चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांना न्यायालयासमोर पीसीआरसाठी हजर करण्यात येणार आहे.

या कारवाईत पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, परतूर पोलीस निरीक्षक मच्छींद्र सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक अमोल रावते, विठ्ठल केंद्रे, भिमराव मुंढे तसेच पोलीस अंमलदार नंदू खंदारे, राम हाडे, ज्ञानेश्वर वाघ, परमेश्वर माने, दीपक आहे, नरेंद्र चव्हाण, अच्युत चव्हाण आणि महिला पोलीस अंमलदार कल्पना धडे यांचे विशेष योगदान राहिले.

# गटशेती ही शाश्वत शेतीचा पर्याय : राहुल कर्डिले



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ जुलै -**

शेतीमध्ये प्रगती साधायची असेल, तर गटशेती करणे ही काळाची गरज आहे. गटशेती ही शाश्वत शेतीचा प्रभावी पर्याय ठरू शकते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. कै. वसंतराव नाईक यांची जयंती व कृषिदिनानिमित्त आज जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, आत्मा, जिल्हा परिषद कृषी विभाग व पंचायत समिती, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, प्र. जिल्हा कृषी अधिकारी सचिन कपाळे, उपविभागीय कृषी अधिकारी अनिल शिरफुले, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रविणकुमार घुले, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, कृषी विज्ञान केंद्र पोखर्णीचे शास्त्रज्ञ प्रा. डॉ. देविकांत देशमुख, प्रा. शेळके तसेच प्रगतिशील शेतकरी कांतराव देशमुख आदींची उपस्थिती होती.

गटशेतीमुळे मजुरांच्या टंचाईचा प्रश्न कमी होतो. तसेच उत्पादन खर्च घटून शेती उत्पादन वाढते. उमेदच्या माध्यमातूनही गटशेतीचे यशस्वी प्रयोग करता येऊ शकतात. चालू वर्षात किमान २०० शेतीगट तयार करण्याचा निर्धार असल्याचे मत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी व्यक्त केले. पाणी फाउंडेशनच्या सहकार्याने जलसंधारणाच्या कामांना गती देण्यात येणार असून, कपाशी वेचणी दरम्यान होणारे नुकसान लक्षात घेऊन १५ ते २० हजार शेतकऱ्यांना प्रायोगिक तत्त्वावर कापूस वेचणी बॅग देण्यात येणार आहेत. तसेच पोखरा योजनेअंतर्गत फळबाग लागवडीलाही प्रोत्साहन दिले जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहल कर्डिले यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नैसर्गिक शेती, परसबाग व हळद प्रक्रिया या पत्रिकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. ड्रोनद्वारे फवारणीचे प्रात्यक्षिकही दाखवण्यात आले.

शेतकरी हा देशाचा पोशिंदा असून, पारंपरिक पद्धतींसोबत नवतंत्रज्ञान स्वीकारणे हे अत्यावश्यक आहे. लोकसंख्या वाढत असताना शेतीचे क्षेत्र स्थिर आहे, त्यामुळे ड्रोन फवारणी, नैसर्गिक शेती, बायो फर्टिलायझर, ड्रिप इरिगेशन यांचा वापर करणे गरजेचे असल्याचे मत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद उपकर योजनेत सन २०२५-२६ साठी शेतकरी उत्पादन कंपनी व गटशेती करणाऱ्यांना किसान ड्रोन व बायो फर्टिलायझर लॅबसाठी निधी उपलब्ध करून दिला जात आहे. किसान ड्रोन साठी चार लाखांपर्यंत तर बायो फर्टिलायझर प्रयोगशाळेसाठी १० ठिकाणी दीड लाखांपर्यंत अनुदान देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी राज्य व जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नैसर्गिक शेती करणाऱ्या ८२ शेतकऱ्यांना प्रमाणिकरण प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. पाणी फाउंडेशनचे संतोष शिनगारे, नैसर्गिक शेती प्रमाणिकरणचे हर्षल जैन, अमोल केंद्रे, प्रगतिशील शेतकरी भगवानराव इंगोले, विशाल शिंदे, उत्तम सोनकांबळे, महमंद गौस आदींनीही आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. जिल्हा कृषी अधिकारी सचिन कपाळे यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम कवडे यांनी तर उपस्थितांचे आभार वसंत जारिकोटे यांनी मानले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अधिकारी, कर्मचारी व जिल्हयातील शेतकरी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

# लिंबायत येथे नवीन अंगणवाडी इमारतीचे व क्रिडांगणाचे उद्घाटन



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०१ जुलै -**

डोंगराळ आणि आदिवासी भागांच्या विकासासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याद्वारे चालवली जाणारी डोंगरी विकास योजना (Hill rea Development Programme) अंतर्गत मंजूर तालुक्यातील लिंबायत-नेर गट ग्रामपंचायत मधील लिंबायत (नवीन) येथे बांधण्यात आलेल्या नवीन अंगणवाडी इमारतीचा व क्रिडांगणाचा उद्घाटन सोहळा सरपंच सौ.उज्वला चुंगडे यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.यावेळी नूतन इमारतीत प्रवेश करणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे अंगणवाडी पर्यवेक्षिका एम.व्ही. बुटले यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

डोंगराळ भागातील लोकांचे जीवनमान सुधारणे त्यांची सामाजिक आणि आर्थिक स्थिती उंचावणे, आणि परिसंस्थेचे संवर्धन करणे हे मुख्य उद्देश असलेल्या डोंगरी विकास योजने अंतर्गत गावातील बाल्यावस्थेतील मुलामुलींचा शिक्षणाचा पाया मजबूत व्हावा या उद्देशाने लिंबायत (नवीन) ग्रामपंचायत कार्यालय परीसरात बांधण्यात आलेल्या नवीन अंगणवाडी इमारत व क्रिडांगणाचा उद्घाटन सोहळा सोमवार दिनांक ३० जून रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ.उज्वला चुंगडे ह्या होत्या तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,शाखा माहूर तालुका अध्यक्ष बजरंगसिंह हजारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना (खउऊड) विभागाच्या अंगणवाडी पर्यवेक्षिका एम.व्ही.बुटले, पोलिस पाटील नितीन भोयर,ग्रा.पं.सदस्या योगिता गायकवाड,पत्रकार पंकज जयस्वाल यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी पत्रकार बजरंगसिंह हजारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, लोककल्याणकारी वृत्तसेवा देण्यासाठी मी सदैव तत्पर असल्याचे सरपंचांना आश्वासन दिले. तर,महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, शाखा माहूर तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सरपंच उज्वला चुंगडे यांनी अभिनंदन करत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी रोजगार सेवक आनंद चुंगडे यांनी हजारी यांना शॉल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्काराने सन्मानित केले.

अध्यक्षीय समारोप करताना सरपंच उज्वला चुंगडे म्हणाल्या कि, यापुढेही गट ग्रामपंचायत अंतर्गत गावात बरीचशी विकासकामे करायची असून, वशेषकरून त्यामध्ये डोंगरी विकास योजने अंतर्गत लिंबायत (जुने) ते लिंबायत (नवीन) हा साधारणपणे दोन किलोमीटरचा रस्ता, गावातील अंतर्गत रस्ते, गावापासून राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा रस्ता (अप्रोच रोड), अंगणवाडीच्या इमारतीभोवती संरक्षक भिंत बांधणे, वाचनालय, एस.टी. पिकअप शेड (प्रवासी निवारा) इत्यादी कामे प्रामुख्याने करायची असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच,नवीन अंगणवाडी इमारतीचे दर्जेदार बांधकाम जलदगतीने पुर्णत्वास नेण्यासाठी ग्रामविकास अधिकारी पाईकराव यांचे कंत्राटदारास मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्याचा त्यांनी यावेळी आवर्जून उल्लेख केला.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक पंजाबराव जाधव, तातेराव शिंदे, प्रशांत जाधव, ज्येष्ठ समाजसेवक मनोहर सिंह चुंगडे,पा.पु.कर्मचारी मनोज जोनवाल, अंगणवाडी सेविका सोनाली जाधव, अंगणवाडी मदतनीस सारिका धनावत, अंगणवाडी सेविका (नेर) डोंगरे, बालक-बालिका यासह जिप शाळेचे शिक्षकवृंद,विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक व सुत्रसंचलन जिप शाळा लिंबायतचे शिक्षक विजय घाटे यांनी केले तर मुख्याध्यापक शैलेश गिऱ्हे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त



### चिटमोगरा जिल्हा परिषद शाळेत स्व. वसंतराव नाईक जयंती साजरी

**नायगाव** -तालुक्यातील चिटमोगरा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे शिल्पकार स्व. वसंतराव नाईक यांची जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,चिटमोगरा येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी सौ. सविता जोशी कहाळेकर उपस्थित होत्या. सूत्रसंचालन संतोष खरकाडे यांनी अत्यंत नेटकेपणाने केले. या वेळी मार्गदर्शन करताना अनिल गायकवाड म्हणाले, वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात हरित क्रांती घडवून आणण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावली. संकरीत बियाण्यांचा प्रसार करून राज्य अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण व्हावे, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे त्यांना 'हरित क्रांतीचे प्रणेते' म्हणून ओळखले जाते. स्व.वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री होते. त्यांच्या कार्यकाळात ग्रामीण व कृषी विका साला विशेष चालना मिळाली. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्याविषयी अभिमान निर्माण करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी नागोराव झुंजारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### बालाजी मटकमवाड पोमनाळकर प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

**नवीन नांदेड**-विद्यानिकेतन प्राथमिक शाळा हडको नवीन नांदेड येथील सहशिक्षक बालाजी कोंडीबा मटकमवाड राहणार पोमनाळ




तालुका भोकर हे दिनांक ३० जून २०२५ रोजी नियत वयोमानाने ३७ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. विद्यानिकेतन प्राथमिक शाळा हडको नवीन नांदेड येथे बालाजी मटकमवाड हे २० ऑगस्ट १९८८ रोजी सहशिक्षक म्हणून शाळेवर रुजू झाले होते. सदरील शाळेवर ३५ वर्षे सहशिक्षक म्हणून शिक्षक पदावर काम केले तर २ वर्ष मुख्याध्यापक म्हणून कामकाज बघितले असताना नियत वयोमानाने वयाच्या ५८ व्या वर्षी दिनांक ३० जून २०२५ रोजी ३७ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या सेवानिवृत्ती बद्दल विद्यानिकेतन प्राथमिक शाळा हडकोच्या वतीने बालाजी कोंडीबा मटकमवाड यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन दिनांक ५ जूलै २०२५ रोजी हडको येथील गोविंद गार्डन मंगल कार्यालय येथे करण्यात येणार आहे.

### इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचा उत्कृष्ट निकाल

**नवीन नांदेड**-महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पदविका परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. सहयोग सेवाभावी संस्थेच्या इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक), विष्णुपुरी नांदेड या महाविद्यालयाने आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयातील प्रथम वर्षाचा विद्यार्थी पवन फाजगे याने ८७.८८ % गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच महाविद्यालयाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी आरती चांदोलकर (कॉम्पुटर इंजीनियरिंग- ८६.६३%), श्रेया भवरे (सिविल इंजीनियरिंग-९१.३७%), हनुमान शिंदे (इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग- ८२.५० %), शेख फहाद (मेकॅनिकल इंजिनिअरिंग- ८२.८९ %), साक्षी पांपटवार (इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियरिंग-९०.५३%) गुण मिळवले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव डॉ.संतुकराव हंबर्डे, प्राचार्य शिवानंद बारसे, प्राचार्य डॉ. ईशान अग्रवाल, विभाग प्रमुख प्रा. नारायण डाखोरे प्रा. नम्रता चौधरी प्रा. मो. नाईक, प्रा. तेहनियत सद्दाफ,प्रा. नांदेडकर, शंकर किरकन आदींनी अभिनंदन केले आहे.

### राजेश गायकवाड यांचे निधन

**नरसी** -नायगांव तालुक्यातील नरसी येथील रहिवासी राजेश मरिबा



गायकवाड वय ४० वर्ष यांच दि.३० जुन २०२५ रोजी सोमवारी दुःखद निधन झाले . राजेश गायकवाड यांच्या पार्थिवावर दि. १ जुलै रोजी मंगळवारी दुपारी १२:३० वाजता नरसी ता.नायगाल जि. नांदेड येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुल, वडील , भाउ, बहीन असा मोठा परिवार आहे. ते सामाजिक कार्यकर्ते संजय गायकवाड मसलगेकर यांचे छोटे बंधू होत.

# दहेगाव रोडवर अवैध रेती तस्करी करणारे ट्रॅक्टर पकडले: महिला ग्राम महसूल अधिकाऱ्यांची धाडसी कारवाई

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०१ जुलै -**

तालुक्यातील आंदबोरी सज्जा अंतर्गत असलेल्या दहेगाव नाल्यातून रेतीची अवैध उत्खनन करून वाहतूक करणारे ट्रॅक्टर महसूलच्या तीन महिला ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी मोठ्या सीताफिने पकडले असून २८ जून रोजी सायं.५ वा. च्या सुमारास दहेगाव ते पाटोदा रोडवर ही धडक कार्यवाही करण्यात आल्याने अवैध रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत.



याबाबत अधिक वृत्त असे की किनवट तालुक्यातील मौजे अंदबोरी तलाठी सज्जा अंतर्गत असलेल्या दहेगाव नाल्यातून अवैधरित्या बेसुमार रेती उत्खनन करून वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर आंदबोरी तलाठी सज्जाच्या ग्राम महसूल अधिकारी अनुसया ईप्पलवाड,पाटोदा तलाठी सज्जाच्या ग्राम महसूल अधिकारी सिंधू आत्राम व लोणी सज्जाच्या ग्राम महसूल अधिकारी शालनताई मेंडके या तीन महिला कर्मचाऱ्यांच्या पथकाने २८ जून २०२५ रोजी सायं.,५ वाजताच्या सुमारास दहेगाव नाल्यातून अवैध रेती उत्खनन करून पाटोदा मार्गे तस्करी करणारे चक २६-इण-०७१५ या क्रमांकाचे व महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर मोठ्या शिताफिने पकडून पुढील कार्यवाहीस्तव तहसील कार्यालयात लावले.या कामी मंडळ अधिकारी श्री गाडे यांनी सहकार्य केले.

सहा. जिल्हाधिकारी जेनीथ चंद्रा दोंतुला यांच्या मार्गदर्शनाखाली रेती तस्करीवर आळा घालण्यासाठी किनवटच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार डॉ शारदा चौंडेकर यांनी आता महिला कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून रेती तस्करीविरोधात धडक मोहीम हाती घेतली असून महिला पथकाच्या या धाडसी कारवाईमुळे रेतीतस्करांचे धाबे दणाणले आहेत

# उड्डाणपुला खालच्या कामात कंत्राटदाराचे दुर्लक्ष



**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.०१ जुलै -**

हदगाव शहराजवळील असलेल्या उड्डाणपुला संदर्भात वाहतुकीच्या नियमांची ऐशी- तैशी संबंधित कंत्राट दाराकडून होत असतांना पुलाच्या संबंधित चक्रावून टाकणारी सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची असलेली बाब व धक्कादायक माहिती समोर आली असून या उड्डाणपुला खालून जाणाऱ्या नैसर्गिक नाल्याच्या प्रवाहावर सर्विस रोडच्या पुलाखाली जमिनीवरती पुलाच्या मजबुतीकरण करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे बेड न टाकल्यामुळे भविष्यात हे पूल कमकुवत होऊन पाण्याच्या प्रवाहाच्या दबावामुळे कधीही कोसळण्याची दाट शक्यता आहे. यावेळेस झालेल्या जीवितहानीस कोण जबाबदार राहणार ? असे या निमित्ताने प्रश्न उपस्थित होत आहे.

या महागाव - वारंगा या राष्ट्रीय महामार्ग अंतर्गत असलेल्या टप्प्याचे काम घेतलेले कंत्राटदाराने आतापर्यंत सुरक्षतेच्या दृष्टिकोनातून कोणतेच असे भरीव काम केल्या नसल्याची ओरड ही नेहमीच प्रवाशांकडून होत असताना या उड्डाणपुला संदर्भात आणखीन एक धक्कादायक बाब समोर आली असून ज्यात उड्डाणपुला शेजारी हदगाव शहरास जोडणाऱ्या सर्विस रोडच्या खाली जमिनी वरती क्रॉंकेट बेड न टाकताच रोडचे बांधकाम केले आहे त्या ठिकाणी एक नैसर्गिक नाला असून त्यातून जर पाण्याचा प्रवाह वाढला तर त्याचे परिणाम सरळ - सरळ या उडान पुलावर ती होईल व यावरून वाहतूक होत असताना एखादा एखादी अप्रिय घटना टाळण्याकरिता वित्तीय हानी टाळण्यासाठी तसेच हदगावचा संपर्क तुटण्याआधीच संबंधित हुकूमशाही व दंडेलशाही चा पाईक असणाऱ्या मी म्हणेल ती पूर्व दिशा अशा वादग्रस्त कंत्राटदाराने त्या ठिकाणी त्वरित क्रॉंकटीकरण करावे.

# देगावचाळ परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ जुलै -**

येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष लोखंडे यांनी महिलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी शहरातील देगावचाळ परिसरात प्रभाग क्रमांक १८ मधील विविध भागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी वजिराबादचे पोलीस निरीक्षक श्री परमेश्वर कदम यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शहरातील प्रभाग क्रमांक १८ मधील देगावचाळ, भैय्यासाहेब आंबेडकर नगर, भीमघाट, गंगाचाळ, नल्लागुट्टाचाळ, पंचशीलनगर, खडकपूरा इत्यादी परिसरांमध्ये महिलांची व मुलींची सुरक्षितता तसेच गुन्हेगारी नियंत्रणासाठी सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे अत्यंत आवश्यक झाले आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरतील. सामाजिक स्तरावर देखील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी व प्रशासनाच्या उपाययोजना परिणामकारक ठराव्यात, याकरिता वरील भागांमध्ये तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या मागणीबाबत पूर्वी देखील चर्चा झाली असून, पुढील पंधरवड्यात कॅमेरे बसविण्याची येईल असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांकडून देण्यात आले होते. त्या आश्वासनानुसार प्रभागात लवकरात लवकर सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे लोखंडे यांनी सांगितले. निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, महानगरपालिकेचे आयुक्त यांना देण्यात आल्या आहेत.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश

**नांदेड** -नांदेड जिल्ह्यात १५ जुलै २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १५ जुलै २०२५ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा लागू होणार नाही.



**किनवट-महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे शिल्पकार स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र वन विभागाच्या वतीने हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत किनवट येथे सामाजिक वनीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत नागरी दवाखाना व पोलीस स्टेशन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.कार्यक्रमास विभागीय वन अधिकारी संदीप चव्हाण आणि सहायक वनसंरक्षक सौ. शुभांगी लोणकर यांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमात शासकीय यंत्रणा, आरोग्यसेवा, पोलीस प्रशासन व वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.**

# आषाढी एकादशी निमित्त 'गजर हरी नामाचा' कार्यक्रम; दिग्गज कलावंताची उपस्थिती

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०१ जुलै -**

आषाढी एकादशीच्यानिमित्ताने कलांगन प्रतिष्ठानच्या वतीने गजर हरी नामाचा -आषाढी महोत्सवाचे आयोजन दि. ४ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता कुसूम सभागृहात करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील दिग्गज कलावंत विठ्ठल माऊलीच्या भक्तीगितांची सुरेल मैफल नांदेडकरांसमोर सादर करणार आहेत.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित गजर हरी नामाचा या कार्यक्रमाची संकल्पना निर्मिती निवेदन ॲड. गजानन पिंपरखेडे यांची असून पिंपरखेडे यांनी राज्यभरात आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यासह विविध कार्यक्रमाचे आयोजन करतांना उत्कृष्ट निवेदन ही केले आहे. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन पत्रकार विजय जोशी यांचे असून संगीत संयोजन डॉ. प्रमोद देशपांडे यांचे आहे. कार्यक्रमाचे निर्मितीसहाय्य रमेश मेगदे यांचे असून ध्वनी व्यवस्था संतोष गट्टानी यांचे आहे.



या कार्यक्रमात महाराष्ट्रातील दिग्जकलांवत तसेच नांदेडचे स्थानिक कलावंत विठु माऊलीच्या भक्ती गितांचा श्रवणीय कार्यक्रम सादर करणार आहेत. यात पुण्याचे दिग्ज कलावंत चैतन्य कुलकर्णी, पुण्याची प्रसिध्द गायीका सौ. असावरी जोशी, नांदेडचे प्रख्यात गायक विलास गारोळे व नांदेडची उदयोन्मुख गायीका सौ. रागीणी जोशी यांच्यासह अन्य कलावंत नांदेडकरांना विठ्ठल भक्तीत मंत्रमुग्ध करणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटक प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश सुनील वेदपाठक व जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे हे उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थितांमध्ये डॉ. राहुल पटणे, प्रा. प्रभाकर उदगीरे, बालाजी पांडागळे, रमेश मिरजकर, अनिल शेटकार, राजेंद्र हुरणे यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमासाठी संगीत साथ डॉ. प्रमोद देशपांडे, राजु जगधने, पंकज शिरभाते, तुषार साळवी, स्वपनील धुळे, विश्वेश्वर जोशी यांची असणार आहे. या कार्यक्रमासाठी श्री स्वामी समर्थ मंदिर व अन्नछत्र सोमेश कॉलनी नांदेड यांचे विशेष सहकार्य असणार आहे. कलांगण प्रतिष्ठान ने यापुर्वी देखिल नांदेडकरांना विविध कार्यक्रमांची मेजवानी दिली असून गजर हरी नामाचा ही आगळी वेगळी भक्तीगितांची अनोखी मैफल नांदेडकरांना अनुभवता येणार आहे. कुसूम सभागृहात ४ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात नांदेडकरांनी सहभागी होवून भक्तीगितांच्या कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश मेगदे, नंदकुमार दुधेवाड, शंतनु डोईफोडे, गोवर्धन बियाणी, रामशेट्टी तुप्तेवार, बापु दासरी, माधवराव पटणे, बालासाहेब मादसवाड, रमाकांत गंदेवार, प्रणव मनुरवार, विजय डुमणे, लक्ष्मीकांत बंडेवार, पुरूषोतम देशपांडे, स. जगजिवनसिंघ रिसालदार, सचिन कोटलवार, संतोष पाळेकर, इंजि. नारायण आकमार, इंजि. रमेश सुरकुटवार, डॉ. प्रसाद जोशी, ॲड. उर्मिला हटडे आदी मान्यवर परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमासाठी महिला समिती देखिल कलांगण प्रतिष्ठाणने स्थापन केली आहे.

# घरकुलची उद्दीष्टपूर्ती, रेल्वेला गती अन् जलजीवनची प्रगती दाखवा

## दिशा समितीच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणेंच्या अधिकाऱ्यांना सुचना, सलग सहा तास घेतली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**



बीड जिल्ह्यातील ७५ हजार गोरगरीबांना पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर झालेले असून त्यांची दिवाळी नवीन घरात साजरी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत, याच बरोबर रेल्वे विभागाने विद्यूत जोडणीचे रखडलेले काम गतीने पूर्ण करावे आणि रखडलेल्या जलजीवन मिशनच्या कामात प्रगती दाखवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. दरम्यान, खा.सोनवणे यांनी दुपारी बारा ते दोन आणि तीन ते सात अशी सहा तास बैठक घेतली.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या दालनात दिशा समितीची बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, प्रकल्प संचालक संगिता देवी पाटील यांची उपस्थिती होती. बैठकी सुरुवात करण्याआधी आठ महिला बचत गटांना कर्ज मंजुरी पत्र खा.बजरंग सोनवणे व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यानंतर प्रधानमंत्री आवास योजना शहरी व ग्रामीणचा आढावा घेण्यात आला. यावेळी खा.सोनवणे यांनी शासनाने दिलेले उद्दीष्ट पुर्ण करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करू, गरीबांची दिवाळी नव्या घरात व्हावी, त्यांच्याही आयुष्यात आनंदी क्षण यावा, यासाठी शासकिय यंत्रणेने ही घरे पुर्ण करून घेण्यासाठी प्रयत्न करावेत. नंतर रेल्वे विभागाचा आढावा घेण्यात आला. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या रेल्वे मार्गाची सर्वेक्षण कामाची सद्यस्थिती जाणून घेत, बार्शी नाका (बीड) येथे रेल्वे थांबा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे, ऋढोले वस्ती (बीड) अंडरपास तयार करणे बाबतच्या प्रस्ताव मंजुरीचे सद्यस्थिती काय आहे, आहिल्यानगर-बीड-परळी रेलमार्गावरील सोलापूरवाडी-कडा-गांधणवाडी-कारेगाव-गोमळवाडा-विघनवाडी-घुगेवाडी-हिवरसिंगा-नवगण राजुरी-चऱ्हाटा येथे रोड ओव्हर ब्रिज करण्याबाबतच्या कामाची सद्यस्थिती, आष्टी स्टेशन येथील रेल्वे विद्युत पुरवठ्याचे काम अधिक गतीने पूर्ण करून बीड-अहिल्यानगर-मुंबई रेल्वे सेवा नियमित चालू करणे बाबत प्रयत्न करा, अशा सुचनाही यावेळी दिल्या. दरम्यान, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनामध्ये टप्पा ३ अंतर्गत जिल्ह्यातील रस्त्याचा समावेश करण्याचा प्रस्ताव तत्काळ पाठवण्या संदर्भात सूचना केल्या.

**बोगस पिकविम्याबाबतही चर्चा**

कृषी विभागाचा आढावा घेत असताना जिल्ह्यातील काही ठिकाणी बोगस प्रकार मागील काळात समोर आलेला आहे. त्यामधील काही शेतकऱ्यांनी आपल्या जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात जाऊन शासकीय जमिनीवरती विमा भरलेला आहे. नियमबाह्य विमा भरणा-या व्यक्तींची आयुक्त कार्यालयातून यादी मागवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केल्या.

**जलजीवनला महत्व द्या**

जिल्ह्यात जलजीवन मिशन योजना जास्त प्रमाणात कागदोपत्री दिसत असून प्रत्यक्ष काम दिसत नाही. याबाबत जिल्हाधिकारी व मुख्यकार्यकारी यांनी गांभीर्याने घेऊन आढावा घेण्याच्या सूचना केल्या. शिवाय या योजनेतून शक्य होईल तितके लवकर कामे पूर्ण करुन गावात पाणी देण्याचा प्रयत्न करा, असेही खा.सोनवणे यांनी म्हटले.

# तुलसी महाविद्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व 'हरित क्रांतीचे प्रणेते' म्हणून ओळखले जाणारे वसंतराव नाईक यांची जयंती दिनांक १ जुलै रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेचे प्रतिनिधी इंजि.दीपंकर रोडे आणि प्राचार्य प्रा.डी. जी. निकाळजे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनीही पुष्प अर्पण करत त्यांच्या कार्यास विनम्र अभिवादन केले

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी उपस्थितांनी वसंतराव नाईक यांच्या कार्याची आठवण करून त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाचे स्मरण केले.

# समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम संस्थेने केले- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**



स्व.काकूंनी लावलेल्या लहान रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या वृक्षाच्या छत्रछायेखाली तेव्हापासून हजारो कुटुंबांना आधार मिळाला आणि यापुढे मिळत राहील. संस्थेने सर्व जाती धर्माला प्राधान्य दिल्यामुळेच या संस्थेत गुणवंत विद्यार्थी घडले आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासणारी ही संस्था समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम करत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे होते तर व्यासपीठावर डॉ.लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, शिक्षणाधिकारी विक्रम सारूक, नानासाहेब काकडे, हर्षद क्षीरसागर, सुभाष क्षीरसागर, उषाताई सरवदे, विजय सरवदे, सतिष काटे, अजित जाधव, मकबूलभाई, सुधाकर मिसाळ, एम.बी.सानप, श्रीराम बहीर, मौलाना काझी महंमद, सहाय्यक प्रशासकिय अधिकारी योगेश पवार, एम.ए. राऊत, प्रकाश राठोड, किर्तीताई पांगारकर, इंजि.भाऊसाहेब देशमाने आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३२ वर्षे ज्ञानदानाचे काम करून संस्थेत प्रमाणिकपणे काम करणारे एम.सी. जाधव भटक्या विमुक्त समाजात जन्मलेला एक तरूण उच्च शिक्षण घेवून उत्तम काम करू शकतो आणि सेवा करू शकतो असे लोक संस्थेला मिळाले. शिवाजी पाटोळे याने स्व.काकूंपासून सेवा केली. संस्थेने सेवेत घेताना जात-पात, धर्म कधीच बघीतला नाही, गुणवान लोकांना संधी देवून संस्थेने गुणवान विद्यार्थी घडवले. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. हे बदल स्वीकारत छोट्या रोपट्याने वटवृक्षात रूपांतर केलं आहे. अनेक अडचणीवर मात करत सामाजिक बांधीलकी जोपासत संस्थेचा प्रत्येक समाज घटकाला फायदा व्हावा असा प्रयत्न राहीला. बीड जिल्हा संवेदनशील जिल्हा आहे. धार्मिक वृत्ती जोपासणात वसा आणि वारसा चालवणारा जिल्हा आहे असे त्यांनी सांगितले. याशिवाय विक्रम सारूक, लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, महादेव जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी शेषनारायण कोळेकर, प्राचार्य विश्वास कंधारे, मुख्याध्यापक अण्णासाहेब थिटे, धनवंत मस्के, सुरेश पेशकार, व्ही.आर. शिंदे, सुधाकर तांदळे, अंगद दहिफळे, विष्णु जोगदंड, राजेंद्र कुर्हे, शिरीष घरत, विकास बन्सोडे, विलास येडे, आप्पासाहेब येवले, केशव भांगे, प्रशांत पवळ, किशोर उपरे, प्रदिप जगताप, अभिषेक राऊत, रावसाहेब भोसले, शहाजी तेलप, सुनिल शिंदे, रियाज बेग, सुहास अमरापूरकर, प्रफुल्ल भोज यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, महिला-पुरूषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आशा हंडिबाग यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.श्रीराम जाधव यांनी केले शेवटी प्रा.राजेंद्र गाडेकर यांनी उपस्थितांच आभार मानले.

# बीडमध्ये महिलांनी काढला कॅन्डल मार्च

## अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणी नागरिकांमधून संताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**




शहरात अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळप्रकरणी संतप्त नागरिकांनी सोमवारी (दि.३०) सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात कॅन्डल मार्च काढून निषेध व्यक्त केला. यावेळी सर्वस्तरातील महिला, युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

हातात कॅन्डल्स व मागण्यांचे फलक घेत सहभागी महिलांनी मुलगी आहे, अबला नाही, अत्याचाऱ्यांना माफी नाही; बीड जागं झालं, न्यायासाठी उभं राहिलं; नराधमांनो, चुकीला माफी नाही आणि एसआयटी स्थापन झालीच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. या कॅन्डल मार्चच्या माध्यमातून केवळ नराधम आरोपीच नाही, तर त्यांना पाठीशी घालणाऱ्या लोकप्रतिनिधींचाही निषेध करण्यात आला. ठोस कारवाई न झाल्यास मोठे आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी सर्वस्तरातील महिला, कार्यकर्त्यांसह नागरिकांची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कॅण्डल मार्चचा समारोप झाला.

पीडितेला न्याय मिळेपर्यंत संघर्ष चालू राहणार-आरोपींना मदत करणाऱ्या व्यक्तींना सहआरोपी करण्यात यावे. प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावी. चौकशी महिला आयपीएस अधिकाऱ्यांकडूनच करण्यात यावी. पीडितेला न्याय मिळेपर्यंत संघर्ष चालू ठेवला जाईल, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

# तुलसी फॅशन कॉलेजमध्ये 'एक पेड़ माँ के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**



देवगिरी प्रतिष्ठान संचालित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे पर्यावरण दिनानिमित्त एक पेड़ माँ के नाम या संकल्पनेवर आधारित वृक्षारोपण कार्यक्रम शनिवार, ३० जून २०२५ रोजी उत्साहात पार पडला.

या उपक्रमाअंतर्गत फळझाडे व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.अशोक धुलधुले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाले. यावेळी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने झाडं लावणं हे केवळ जबाबदारी नव्हे, तर एक सामाजिक कर्तव्य असून प्रत्येकाने यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.श्वेता वंजारे यांनी केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षलागवड, संगोपन आणि संवर्धन यावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण रक्षणासाठी पुढाकार घेण्याचा निर्धार व्यक्त केला.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी मिळून भविष्यात अधिकाधिक वृक्षारोपण करण्याचा संकल्प केला.

# बीडमधील सहकार संकुलाच्या उभारणीसाठी दहा कोटी रुपयांची तरतुद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**



राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्विकारल्यानंतर बीड जिल्ह्याच्या वैभवात भर पडेल अशा अनेक विकासकामांना त्यांनी मंजुरी दिली आहे. बीड शहरातील सहकार विभागाच्या मालकीच्या जागेत भव्य सहकार संकुलाची इमारत उभी करण्याची मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. आ. पंडित यांच्या मागणीला दादांनी प्रतिसाद देत दि.४ जून रोजी सहकार संकुलाच्या बांधकामासाठी १४ कोटी ९८ लाख किंमतीच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली होती.





शहरातील श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूल, सुभाष चौक रोड व राणी लक्ष्मीबाई टावर परिसरात बेशिस्तपणे वाहने लावून होणाऱ्या वाहतूक कोंडीवर अखेर पोलिसांनी धडक कारवाईचा बडगा उगारला आहे. संभाजीनगर पोलिसांनी सोमवारी या भागात मोहीम राबवून १९ वाहनचालकांवर कारवाई केली असून, तब्बल १३ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

# भविष्याचा विचार करून गुंतवणूक करावी-सीए.आनंद लोहिया

## सावरकर महाविद्यालयात कृषी दिन, सीए. डे, डॉक्टर डे साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**



केवळ करामध्ये सवलत मिळत आहे म्हणून गुंतवणूक करण्यापेक्षा भविष्यातील दीर्घकालीन विचार करून प्रत्येकाने गुंतवणूक करावी असे प्रतिपादन सीए. आनंद सत्यनारायण लोहिया यांनी केले. येथील सावरकर महाविद्यालयात ०१ जुलै कृषी दिन,सीए.डे, आणि डॉक्टर डे साजरा करण्यात आला. याप्रसंगी बोलताना सीए. आनंद लोहिया म्हणाले की केंद्र सरकारने सर्वांसाठी नवी आणि जुनी अशी किरण कर प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. प्रत्येकाने विचार करून अभ्यास करून कोणत्या रिजिम मध्ये कर भरायचा आर्थिक सल्ला घेऊन निर्णय घ्यावा. तसेच टॅक्स वाचवण्यासाठी गुंतवणूक करण्यापेक्षा भविष्यातील दीर्घकालीन विचार करून गुंतवणूक करावी असे ते म्हणाले. अध्यक्ष समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य सुहास मोराळे म्हणाले की शेतकरी आपल्या अन्नाची काळजी घेतात. डॉक्टर आपल्या आरोग्याची तर सीए आपल्या संपत्तीची. यामुळे कृषी,आरोग्य आणि आर्थिक व्यवहारासंबधी क्षेत्रातील ही तीन्ही व्यक्ती आपल्या जीवनाचे महत्त्वाचे अंग आहेत. टॅक्स संदर्भात योग्य मार्गदर्शन नेहमी घेणे आवश्यक आहे. तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी कृषि दिनी आपण सर्वांनी जास्तीत जास्त झाडे लावण्याचा संकल्प करू. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले .सूत्रसंचालन प्रा संजय काळे, तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.राजपाल जाधव यांनी मानले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, ड.अविनाश लोहिया, महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी, यांची उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांनी आपल्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धेत सहभागी व्हावे-रणवीर पंडित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१ जुलै**



सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. आजच्या या युगामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा महत्त्वाची आहे. प्रत्येक स्पर्धेमध्ये विद्यार्थांनी सहभागी व्हावे असे आवाहन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. बीड येथील शारदा विद्यामंदिर मध्ये विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करताना ते बोलत होते.

शारदा विद्या मंदिर बीड या शाळेमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित साहेब यांच्या हस्ते मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी गुरुकुल वसतिगृहाचे श्री तौर सर, विघ्नेश्वर वसतिगृहाचे श्री वेताळ महाराज, मस्के महाराज, रामकृष्ण वसतीगृहाचे श्री घाडगे सर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी रणवीर पंडित यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला मुख्याध्या पक लक्ष्मण काळे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.